RNI : MAHMAR/2022/88796
www.vidarbhkesari.com Vidabh Kesari News 90969 45629 @vidarbhkesari
vidarbhkesari21@gmail.com

दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
मुख्य संपादक : अमोल कंटाळे
www.vidarbhkesari.com
✲ वर्ष ५ ✲ अंक २४५
अमरावती शुक्रवार ३० जानेवारी २०२६ ✲ पृष्ठ : ४ ✲ मूल्य रु : ३





# अजितदादा परत या!

## बारामती गहिवरली; महाराष्ट्र स्तब्ध; लाडक्या नेत्याला साश्रू नयनांनी निरोप

**▸विदर्भ केसरी। बारामती**

**आपल्या लाडक्या अजितदादांना अखेरचा निरोप देताना बारामती आज धाय मोकलून रडली. 'दादा परत या...' ही आबालवृद्धांची आर्त हाक हृदये विदीर्ण करून गेली. 'विद्या प्रतिष्ठान'च्या मैदानावर अश्रूंचा महापूर आला होता. उपमुख्यमंत्री अजित पवार हे आपल्याला कायमचे सोडून गेले आहेत, यावर कुणाचाच विश्वास बसत नव्हता. अनेक वादळांचा खंबीरपणे सामना करणारा शरद पवार नावाचा योद्धाही शोकाकुल झाला. येणाऱ्या प्रत्येकाचे सांत्वन थरथरणाऱ्या हाताने स्वीकारत ते धीरोदात्तपणे उभे होते पण त्यांच्या मनातील कालवाकालवही लपून राहिली नाही. 'साहेबां'सोबत आज 'दादा' नव्हते. या झंझावाती नेत्याचे शेवटचे दर्शन घेण्यासाठी उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ, कोकण, खानदेश, कर्नाटक आणि तेलंगणमधूनही नेते आणि कार्यकर्ते आले होते.**

'अमर रहे, अमर रहे' अशा घोषणा देताना त्यांचा आवाज कातर झाला होता अन् कार्यकर्त्यांच्या हुंदक्यांनी बारामतीचा आसमंत सुन्न झाला. राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या लाखोंच्या जनसमुदायाने आपल्या लाडक्या 'दादां'ना अखेरचा निरोप दिला. अजित पवार यांचे बुधवारी (ता. २८) विमान अपघातात निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर आज विद्या प्रतिष्ठान संस्थेच्या प्रांगणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यापूर्वी त्यांचे पार्थिव काटेवाडी या मूळ गावी नेण्यात आले. तेथे गावकऱ्यांसह कार्यकर्त्यांनी प्रचंड गर्दी करून आपल्या लाडक्या भूमिपुत्राला अखेरचा निरोप दिला. त्यानंतर दुपारी पावणेबाराच्या सुमारास पवार यांची अंत्ययात्रा विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर आली. सतत कार्यमग्न असणाऱ्या दादांना असे शांत झालेले पाहून कार्यकर्त्यांच्या भावना अनावर झाल्या. 'दादा, परत या' अशी






आर्त हाक देत शोक व्यक्त केला. यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांच्यासह देशभरातील विविध राजकीय पक्षांचे नेते, मंत्रिमंडळातील मंत्र्यांनी पुष्पचक्र अर्पण करून आदरांजली वाहिली. तत्पूर्वी शहा, नवीन यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. दुःख शब्दात मांडण्यापलीकडचे अजित पवार यांचे पुत्र पार्थ आणि जय यांनी पुरोहितांच्या मंत्रोच्चारात अंत्यसंस्काराचे विधी पूर्ण केले. ज्येष्ठ नेते शरद पवार, प्रतिभा पवार, प्रतापराव पवार, सुनेत्रा पवार, श्रीनिवास पवार, सुप्रिया सुळे, अभिजित पवार, रोहित पवार, युगेंद्र पवार यांच्यासह संपूर्ण पवार कुटुंबीयांच्या चेहऱ्यावरचे दुःख शब्दांत मांडण्यापलीकडे होते. प्रचंड गर्दीतून केवळ दादांच्याच नावाचा जयघोष सुरू असताना सर्वांत शेवटी पार्थ पवार, जय पवार या दोघा भावांनी उपस्थितांसमोर हात जोडून नमस्कार केला. देश आणि राज्यपातळीवरील नेते उपस्थित केंद्रीय मंत्री रामदास आठवले, प्रतापराव जाधव, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली अर्पण केली. विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष



शशिकांत शिंदे, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, रक्षा खडसे, राज्यातील मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, हसन मुश्रीफ, छगन भुजबळ, चंद्रकांत पाटील, गणेश नाईक, आदिती तटकरे, राधाकृष्ण विखे पाटील, पंकजा मुंडे, शिवेंद्रराजे भोसले, मंगलप्रताप लोढा, गिरीश महाजन, मेघना बोर्डीकर, शंभूराज देसाई, जयकुमार गोरे, माणिकराव कोकाटे, दत्तात्रेय भरणे, बाबासाहेब पाटील, आकाश फुंडकर, माधुरी मिसाळ, अशोक उईके, खासदार शाहू महाराज छत्रपती, मेधा कुलकर्णी, प्रणिती शिंदे, नीलेश लंके, अमोल कोल्हे, धैर्यशील मोहिते पाटील, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, अशोक चव्हाण, आंध्र प्रदेशचे शिक्षणमंत्री नारा लोकेश, नीरज चंद्रशेखर, श्रीनिवास रेड्डी, राज्याचे मुख्यसचिव राजेश अग्रवाल आदींची उपस्थिती होती.

## आमचा आधार गेला..

**. राज्यभरातून आलेल्या नागरिकांच्या डोळ्यांत अश्रू, मनात वेदना आणि ओठांवर फक्त 'अजितदादा' हेच नाव होते. बारामतीची भूमी आज शोकसागरात बुडालेली दिसत होती. ते दादांच्या आठवणींमध्ये हरवले होते. "आमचा आधार गेला...आमचा दादा गेला" असे म्हणत अनेक कार्यकर्त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. अंत्यविधीच्या वेळी वातावरण अत्यंत भावनिक झाले होते. 'अमर रहे...अमर रहे.... अजितदादा अमर रहे,' 'एकच वादा.... अजित दादा' अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला. या प्रत्येक घोषणेतून कार्यकर्त्यांचे प्रेम आणि दादांप्रती असलेली आपुलकी ठळकपणे जाणवत होती. हा केवळ एक अंत्यविधी नव्हता, तर आपल्या नेत्याला दिलेला शेवटचा सलाम होता.**

## शिस्तप्रिय नेत्याला शिस्तीत निरोप

**विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर लाखोंच्या समुदायाची गर्दी उसळली होती. त्यात कोणताही गोंधळ होऊ नये, यासाठी ठिकठिकाणी पोलिस बंदोबस्त तैनात केला होता. मैदानाच्या मध्यभागी बॅरिकेडिंग करून मैदानाची दोन भागांत विभागणी केली होती. राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेला जनसागर मैदानात दादांच्या पार्थिवाची वाट पाहत होता. केवळ दादांच्या शब्दाखातर नेहमी शिस्त पाळणाऱ्या कार्यकर्त्यांनी आजही जमिनीवर शांत बसून आपल्या नेत्याची वाट पाहिली. अंत्यविधी आटोपल्यानंतरही हा जनसागर तिथून हलण्यास तयार नव्हता. महाराष्ट्राच्या विकासाचा एक महामेरू आज काळाच्या पडद्याआड गेला; पण जाताना लाखो मनांत स्वतःचे अढळ स्थान निर्माण करून गेला, अशीच स्थिती येथे निर्माण झाली होती.**

## विमानाची कागदपत्रे ताब्यात

**▸विदर्भ केसरी।बारामती**

विमानतळाजवळ झालेल्या विमान अपघातात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह पाच जणांचा मृत्यू झाला. या घटनेची केंद्र सरकारने गंभीर दखल घेतली आहे. नागरी विमान वाहतूक महासंचालनालय (डीजीसीए) व विमान अपघात तपास ब्युरो (एएआयबी) या दोन्ही संस्थांनी तपास सुरु केला आहे. 'डीजीसीए' व 'एएआयबी' यांचे पथक बारामतीमध्ये तळ ठोकून आहे, तर 'एएआयबी'च्या दुसऱ्या पथकाने दिल्ली येथील संबंधित विमान ऑपरेटरच्या कार्यालयातून विमानाची देखभाल आणि उड्डाणविषयक सर्व महत्त्वाची कागदपत्रे ताब्यात घेतली आहेत. 'डीजीसीए'ने संबंधित वैमानिक आणि क्रू मेंबर्सचा वैद्यकीय अहवाल प्राप्त केला आहे. यामुळे उड्डाणावेळी वैमानिकांची शारीरिक स्थिती कशी होती, याची माहिती मिळणार आहे.

बारामतीमध्ये दाखल झालेल्या 'एएआयबी' पथकाचे नेतृत्व मुख्य तपास अधिकारी रामचंद्रन करत आहेत. तसेच, मुंबईहून 'डीजीसीए'चे तीन अधिकाऱ्यांचे पथक तपासात तांत्रिक सहकार्य करीत आहे. या दोन्ही पथकांनी ब्लॅक बॉक्ससह विमानाचे सर्व अवशेष ताब्यात घेतले आहेत. शिवाय धावपट्टीची स्थिती देखील जाणून घेतली आहे. शिवाय अन्य तांत्रिक पुरावे देखील गोळा करीत आहेत. हा अपघात अत्यंत गंभीर असल्याने याची माहिती आंतरराष्ट्रीय नियमांनुसार, आंतरराष्ट्रीय नागरी विमान वाहतूक संघटनेला (आयसीएओ)देखील देण्यात आली आहे.

बारामती विमानतळावरील 'टेबल टॉप' प्रकारची धावपट्टी धावपट्टीची 'अस्फाल्ट' प्रकारच्या पृष्ठभागाची स्थिती कशी अपघातावेळी विमानतळावर कोणती दिशादर्शक साधने उपलब्ध होती का लँडिंगवेळी दृश्यमानता किती होती ब्लॅकबॉक्समधील पुरावे वैमानिक - हवाई नियंत्रण कक्षाशी झालेला संवाद



दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू

शुक्रवार, ३० जानेवारी २०२६ | २

## अग्रलेख

# दादा परत या...

अजित पवारांचा दिवस लवकर सुरू होत असे. भल्या सकाळी ते अचानक कुठे भेट देतील, कशाची पाहणी करतील, याचा अंदाज बांधता येत नसे. अशाच एका सकाळी राजभवनात शपथ घेऊन त्यांनी महाराष्ट्राला धक्का दिला होता. मात्र, बुधवारी सकाळी त्यांनी जो धक्का दिला, त्यातून महाराष्ट्र सावरलेला नाही. संपूर्ण महाराष्ट्र शोकव्याकुळ झालेला आहे. एका तडफदार नेत्याला आपण गमावले आहे. ज्या अपघातामुळे महाराष्ट्राने असा कर्तबगार नेता गमावला, त्या विमान अपघाताची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. असा एखादा नेता घडण्यासाठी कित्येक वर्षे जातात. राजकारणाच्या आखाड्यात सुमारे पाच दशके असूनही, आपल्या शब्दाचा महिमा अजित पवारांनी कायम ठेवला होता. दादा जे बोलतात, तेच करतात, ही त्यांची ख्याती होती. जे अशक्य आहे, ते स्पष्ट शब्दात सांगणार. मात्र, एकदा शब्द दिला की ते काम तडीस नेणार, ही खात्री होती. त्यामुळेच 'कामाचा माणूस' ही त्यांची ओळख होती. काम करताना कोण कुठल्या पक्षाचा, हेही ते कधी बघत नसत. अगदी सामान्यातल्या सामान्य माणसालाही ते आपले वाटत. दादा हे रसायनच वेगळे होते. 'मैने हमेशा मेरे दिल की सुनी है...', असे ते एका मुलाखतीत म्हणाले होते. याच स्वभावामुळे त्यांनी पारंपरिक राजकारणाचे निकष बदलून टाकले. आपल्या मनात काय आहे, याचा इतरांना पत्ता लागता कामा नये, हे अनेक राजकीय नेत्यांचे स्वभाववैशिष्ट्य. दादा मात्र कोणाचाही मुलाहिजा न ठेवता थेटपणे बोलणारे. जे पोटात आहे, तेच ओठात आणणारे. त्याची काय किंमत चुकवावी लागेल, याचा जराही विचार न करणारे. ते महाविकास आघाडीत असोत की महायुतीत, आपली थेट भूमिका त्यांनी कधी लपवून ठेवली नाही. जात वा धर्माचे राजकारण त्यांनी कधी केले नाही. त्यांना संसदीय राजकारणाची शिस्त माहीत होती. सामान्य माणूस हा लोकशाहीत मालक आहे, याबद्दल दुमत नव्हते. त्यामुळे एखाद्या कर्तबगार स्टेट्समनप्रमाणे 'नो नॉनसेन्स' अशा पद्धतीने ते काम करत राहिले. ते कार्यकर्त्यांचे लाडके 'दादा' झाले, त्याचे कारण हेच. दिलेला शब्द पाळणे, कार्यकर्त्यांना प्रेमाने जपणे आणि काम करेल त्याला संधी देणे या स्वभावामुळे अजित पवारांना असा जनाधार मिळू शकला. महाराष्ट्राच्या राजकारणात उपमुख्यमंत्रिपद पहिल्यांदा आले ते १९७८ मध्ये. बॅ. नासिकराव तिरपुडे हे पहिले उपमुख्यमंत्री. त्यानंतर अलीकडच्या इतिहासात हे पद अजित पवारांसाठीच तयार केले आहे असे वाटावे, इतक्या वेळा त्यांनी ते मिळवले. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण असोत की देवेंद्र फडणवीस, उद्धव ठाकरे असोत की एकनाथ शिंदे, अजित पवारांनी उपमुख्यमंत्री म्हणून काम करताना आपला ठसा उमटवला. अजित पवारांचे राजकारण आकाराला आले ते बारामती तालुक्यात. त्यामुळे ते ग्रामीण भागातील नेते. आपला हा ग्रामीण बाज त्यांनी कधी लपवला नाही. उलटपक्षी अभिमानाने मिरवला. त्यांच्या वक्तृत्वाचे अनेक चाहते होते. भाषण असो की पत्रकार परिषद, आपल्या खास रांगड्या आणि खेळकर शैलीत अजित पवार बोलत. या महानगरपालिका निवडणुकीत त्यांनी थेट भाजपलाच अंगावर घेतले. पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत अजित पवारांनी मोठे आव्हान उभे केले. ही निवडणूक त्यांनी विकासाच्या मुद्द्यावर आणली. अर्थात, त्यांना अपेक्षित यश मिळाले नाही. मात्र, लगेच ते जिल्हा परिषद निवडणुकीच्या तयारीला लागले. अलीकडची घटना. पुणे ग्रॅण्ड सायकल टुरचा समारोप होता. अजित पवार प्रमुख पाहुणे होते. त्यावेळी ते म्हणाले, 'पुणेकरांनी या सायकल स्पर्धेला जोरदार प्रतिसाद दिला. अर्थात, महापालिका निवडणुकीत तसा प्रतिसाद आम्हाला दिला नाही, ही गोष्ट वेगळी'... त्यांची विनोदबुद्धी अतिशय तल्लख. राजकारणात विखार वाढत असताना आणि शह-काटशह म्हणजे राजकारण असा समज झालेला असताना, अजित पवारांचा हा दिलखुलास मोकळेपणा त्यांच्या विरोधकांनाही आवडत असे. अजित पवारांचे हे असे व्यक्तिमत्त्व घडले, ते त्यांच्या प्रवासामुळे. ते राजकारणात तसे १९८२मध्ये आले. अगदी गावापासून सुरुवात केल्याने त्यांना जमिनीवरचे वास्तव माहीत होते. तो काळही वेगळा होता. वसंतदादा पाटील, शंकरराव चव्हाण, शरद पवार, बॅ. ए. आर. अंतुले अशा नेत्यांचे राजकारण अजित पवार बघत होते. एन. डी. पाटील, गणपतराव देशमुख, भाई वैद्य, ग. प्र. प्रधान असे तगडे विरोधक होते. इंदिरा गांधींना आव्हान देणारे शरद पवारही सत्ता गेल्यानंतर विरोधामध्ये उभे होते. यशवंतरावांचा तो अखेरचा काळ होता, मात्र त्यांची प्रभावळ महाराष्ट्राच्या राजकारणात अक्षय होती. खिलाडूपणे राजकारणात कुस्ती करायची. जिंकण्यासाठी डाव टाकायचे. मात्र, विजय असो की पराभव, दोन्ही मान्य करून दोघांनीही लोकांसाठी काम करायचे, असा तो काळ होता. स्वातंत्र्यलढ्यातून प्रेरणा घेऊन उदयाला आलेले राजकारणही अजित पवारांनी पाहिले आणि एकविसाव्या शतकासोबत व्यावसायिक झालेल्या राजकारणातही ते टिकून राहिले. जुन्या प्रेरणा घेऊन नव्या काळाला सामोरे जाताना, लोक हा केंद्रबिंदू कधी सुटला नाही. त्यांचा दरारा होता; पण अर्ध्या रात्री धावून येणारा हाच दादा आहे, हा आधार होता. १९९१मध्ये अजित पवार सर्वप्रथम खासदार झाले. मात्र, शरद पवारांना केंद्रात जायचे असल्याने, त्यांच्यासाठी अजित पवारांनी लोकसभा सोडली आणि ते विधानसभेत आले. हा कालखंड जागतिकीकरणाचा होता. सगळे बदल होत होते. राजकारणही बदलत होते. महाराष्ट्रात प्रथमच शिवसेना-भाजपचे सरकार आले. केंद्रातही एकपक्षीय वर्चस्वाचे दिवस संपले होते. पुणे-मुंबई एक्स्प्रेसवेमुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवड ही शहरे वेगाने विकसित होऊ लागली होती. या शहरांना योग्य दिशेने नेण्यासाठी अजित पवार उभे राहिले. आजचे पिंपरी-चिंचवड शहर हा अजित पवारांच्या द्रष्टेपणाचा आणि कर्तबगारीचा पुरावा आहे, हे त्यांचे विरोधकही मान्य करतील. अजित पवार राजकारणात आले ते शरद पवारांचे बोट पकडून. तेव्हा शरद पवारांचे नाव दुमदुमत होते. वयाच्या अवघ्या अडतिसाव्या वर्षी मुख्यमंत्री झालेल्या या तरुण नेत्याने देशाचे लक्ष वेधून घेतले

# विमान प्रवास आणि सुरक्षितता


**दि. २८ जानेवारीच्या विमान अपघातात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री Ajitdada Pawar अजितदादा पवार यांचा करुण अंत झाला. साऱ्या देशाला या घटनेचा धक्का बसला. तंत्रज्ञान एवढे अद्ययावत झालेले असताना अजूनही विमाने कां कोसळतात त्यांचे अपघात कां होतात, हा केवळ Aviation विमान वाहतुकीच्या क्षेत्रासाठी नव्हे तर सामान्यांच्या मनातलाही प्रश्न.**



विमान अपघाताची बातमी आल्याबरोबर लोकांना धक्का बसतो. विमान प्रवासाची भीती वाटू लागते. मानवाने चंद्रावर पाऊल ठेवले आहे, मंगळावर मोहिमा पाठवल्या आहेत. मानवाने अतिशय बुद्धिमान संगणक बनवले आहेत आणि अत्यंत प्रगत मशीन्स तयार केल्या आहेत. कृत्रिम पल्याडही सुपर इन्टेलिजन्सचे वारे वाहू लागले आहेत. विमानांमध्ये आधुनिक इलेक्ट्रॉनिक्स यंत्रणा, सेन्सर्स, नेव्हिगेशन सिस्टम्स आणि ऑटोपायलट यंत्रणा अशा अनेक गोष्टी असतात. तरीही अपघात होतात. त्यामुळे विमान प्रवासाच्या सुरक्षिततेबद्दल शंका निर्माण होते. सामान्यांना प्रश्न पडतो, की जर तंत्रज्ञानाने प्रचंड प्रगती केली असेल तर विमाने पूर्णपणे क्रॅश-प्रूफ का नाहीत?... याचे उत्तर नाही. विमान वाहतूक सुरक्षित आहे यात वाद नाही. इतर परिवहन व्यवस्थांच्या तुलनेत विमानांचे अपघात कमीच आहेत. तरीही तंत्रज्ञानाला अनेक मर्यादा असतातच. तंत्रज्ञानाद्वारे जोखीम किमान पातळीवर आणली जाऊ शकते, परंतु ती कधीही पूर्णपणे संपत नाही. विमाने अशा वातावरणात उडत असतात, ज्यात भौतिकशास्त्र, हवामान, यांत्रिक प्रणाली आणि मानवी निर्णय या साऱ्यांचा असतो. चुकीच्या वेळी छोट्या समस्या उद्भवतात आणि त्यातून मोठे काही तरी घडते.

अजूनही विमानांचे अपघात कां होतात, हे समजून घेण्यासाठी, आपण प्रथम हे समजून घ्यायला हवे की, Aviation विमान हवेत उडते किंवा उडत राहते कारण त्याचे इंजिन उडण्यासाठी आवश्यक असलेली शक्ती निर्माण करते. एरवी गुरुत्वाकर्षण नेहमीच विमानाला खाली खेचण्याचा प्रयत्न असते. यात काहीही बिघडले तरी विमानाचा तोल जाणे शक्य आहे. जमिनीवर धावताना कारचे इंजिन बिघडले तर कार थांबविली जाऊ शकते किंवा थांबते. हवेत उडत असलेल्या विमानाचे इंजिन बिघडले तर वैमानिकाच्या हाती फार वेळ नसतो. वेगामुळे ही परिस्थिती अधिक गंभीर बनते. व्यावसायिक विमाने ताशी सुमारे ८०० किलोमीटर वेगाने प्रवास करतात. खाजगी जेट विमाने देखील ताशी ५०० ते ६०० किलोमीटर वेगाने जातात. नेमके काय घडते आहे, हे समजून घेण्यासाठी आणि प्रतिक्रिया देण्यासाठी वैमानिकांना फार कमी वेळ मिळतो. उड्डाणाचे सर्वांत धोकादायक टप्पे म्हणजे टेकऑफ आणि लॅण्डिंग. बहुतेक अपघात या दोन टप्प्यांवर होतात. कारण विमान जमिनीच्या जवळ असते आणि वैमानिकांकडे कोणत्याही अडचणीतून फार कमी वेळ (अगदी काही सेकंदांचा) असतो. लॅण्डिंग दरम्यान हवामान, दृश्यमानता आणि धावपट्टीची परिस्थिती सर्वांत महत्त्वाची असते. क्रूझिंगच्या विशिष्ट उंचीवर असताना काही समस्या निर्माण झाल्यास वैमानिकांना विचार करण्यासाठी आणि कृती करण्यासाठी वेळ मिळतो. जमिनीजवळ असताना तशी परिस्थिती नसते. याशिवाय, हवामान हा विषय विमान वाहतुकीतील सर्वांत मोठ्या आव्हानांपैकी असतोच. कोणतेही निसर्गावर नियंत्रण ठेवू शकत नाही. वैमानिकांना धुके, पाऊस, वादळे, जोरदार वारे, वीज इत्यादी गोष्टींचा उड्डाणादरम्यान सामना करावा लागतो. धुक्यामुळे दृश्यमानता इतकी कमी होऊ शकते की शेवटच्या क्षणापर्यंत धावपट्टी दिसत नाही. वादळामुळे वर आणि खाली शक्तिशाली हवेचे प्रवाह निर्माण होतात. पायलट, सह-पायलट, हवाई वाहतूक नियंत्रक, देखभाल अभियंते आणि ग्राऊंड स्टाफ सर्व महत्त्वाची भूमिका बजावत असतातच. पण, शेवटी ती माणसेच आहेत. ती तणावग्रस्त होऊ शकतात किंवा गोंधळून जाऊ शकतात. ती सूचनांचा चुकीचा अर्थ लावू शकतात. उपकरणांचे रीडिंगही चुकीचे होऊ शकते. आतापर्यंतच्या अनेक अपघातांच्या चौकशा असे सांगतात की, विमानांचे अपघात हे मोठ्या चुकीपेक्षाही चुकीच्या किंवा त्रुटीपूर्ण मानवी निर्णयांच्या साखळीमुळे घडतात. विमान देखील मशीन आहे आणि सर्व मशीन्सप्रमाणे ते देखील बिघडू शकते. विमानात हजारो सुटे भाग असतात. इंजिन, वायर्स, सेन्सर्स, संगणक, हायड्रॉलिक्स, लॅण्डिंग गियर आणि बरेच काही. देखभालीचे कठोर नियम असूनही, काही भाग जीर्ण होऊ शकतात, काही ठिकाणी दोष निर्माण झालेले असू शकतात. काही वेळा मॅन्युअल अर्थात मानवी नियंत्रण आणि स्वयंचलित यांच्यात गोंधळ निर्माण होऊ शकतो. जगातील कोणतेही मशीन पूर्णपणे अपयश-प्रतिरोधक नाही. त्याला विमान अपवाद असू शकत नाही. सुरक्षेत पायाभूत सुविधा देखील भूमिका बजावत असते. मोठ्या आंतरराष्ट्रीय विमानतळांवर प्रगत लॅण्डिंग सिस्टम, रडार सपोर्ट, शक्तिशाली रनवे लाईटिंग आणि अचूक हवामानविषयक माहिती देणारी यंत्रणा असते. छोट्या विमानतळांवर या सर्व सुविधा असतीलच असे अशा ठिकाणी, वैमानिकांना त्यांना जे काही दिसत असते, त्यावरच अधिक अवलंबून राहावे लागते. विशेषतः प्रतिकूल हवामान किंवा रात्रीच्या लॅण्डिंग दरम्यान यामुळे धोका वाढतो. विमान वाहतूक ही अशाप्रकारची जोखीम शक्य तितकी कमी करण्यासाठी डिझाईन केलेली आहे यात वाद नाही. पण, जोखीम शून्य असे डिझाईन अद्याप तयार झालेले नाही. ज्याप्रमाणे रुग्णालयात रुग्णाचा कधीही मृत्यू होणार नाही याची हमी दिली जाऊ शकत नाही, त्याचप्रमाणे कोणत्याही विमानाचा कधीही अपघात होणार नाही, याचीही खात्री देता येत नाही. अत्यंत कडक सुरक्षा मानके, अनेक बॅकअप सिस्टम आणि भूतकाळातील चुकांपासून सतत शिकणे व सुधारणे त्यासाठी आवश्यक असते. विमान वाहतूक ही सांख्यिकीयदृष्ट्या रस्ते प्रवासापेक्षा बरीच सुरक्षित झाली ती या सुधारणांमुळे आणि त्या सुधारणांच्या मुळाशी पूर्वीच्या चुकाच होत्या.अनेक लोक विमान वाहतुकीची तुलना अंतराळ मोहिमांशी करतात आणि विचारतात की, आपण मंगळावर जाऊ शकत असू तर आपण विमानांना पूर्णपणे सुरक्षित का बनवू शकत नाही? ही तुलना योग्य नाही. बहुतांशी अंतराळ मोहिमा मानवरहित किंवा दूरस्थपणे (रिमोटली) नियंत्रित असतात, वर्षानुवर्षे नियोजन झालेले असते आणि त्यांना विमानाच्या वाट्याला येणाऱ्या हवामानाच्या प्रतिकूलतेचा सामना करावा लागत नाही. प्रवासी विमाने दररोज ठरलेल्या वेळी उड्डाण व लॅण्डिंग करतात. त्यांची सुरक्षितता मानवी निर्णयांवर अवलंबून असते. सगळे विमान अपघात एकाच कारणामुळे होत नाहीत. ते छोट्या-छोट्या समस्यांच्या साखळीमुळे होतात हवामानातील प्रतिकूलता, छोटासा तांत्रिक बिघाड, चुकीचा निर्णय हे एकत्रित घडले तर धोकादायक परिस्थिती निर्माण होते. वैमानिकांना फार कमी वेळात यातले नेमके काय ते ओळखावे लागते आणि संचालन करावे लागते वैमानिक दबावाखाली काम करतात त्यांच्यावर असंख्य जिवांची जबाबदारी असते. संकट समोर दिसत असताना त्यांचाही ताण वाढत असणार. विचार करण्याची क्षमता प्रभावित होत असणार आणखी एक महत्त्वाचा मुद्दा आहे अर्थात देखभालीचा. ती देखील मानवी निरीक्षण व कृतीवर अवलंबून असते. तपासणी परिपूर्ण झाली नसेल तर किरकोळ दोष दुर्लक्षित होऊ शकतो आणि तोच मोठा होऊन घातक ठरू शकतो. आकडेवारी स्पष्टपणे दर्शवते की विमान प्रवास हा परिवहनाच्या सर्वांत सुरक्षित मार्गांपैकी एक आहे. लाखो उड्डाणे सुरक्षित चालतात. रस्ते अपघातात मृत्यूची शक्यता विमान खूप जास्त असते तथापि, विमानाचा अपघात होतो तेव्हा त्यात प्राणहानी मोठी होते आणि धक्कादायक असे बरेच काही असते विमान प्रवासाबद्दल नकारात्मकता बाळगण्याचे कारण नाही. आधुनिक काळात तो अनेकांसाठी गरजेचा आहे तंत्रज्ञानाने जोखीम कमी होऊ शकते परंतु ते भौतिकशास्त्राचे नियम बदलू शकत नाही, हवामान नियंत्रित करू शकत नाही किंवा मानवी मुद्दा निकालात काढू शकत नाही, हे वास्तव दुर्लक्षित करता येत नाही.

# नाशिकच्या विकासाशी नाळ जुळलेला नेता



नाशिक जिल्ह्यातील नगर परिषद निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस नंबर १ राहण्यामागे देखील अजित दादा पवार यांचे मोठे योगदान राहिले आहे. भगूर नगर परिषदेवर २५ ते ३० वर्षांनी राष्ट्रवादी काँग्रेस व मित्रपक्षांची सत्ता आली. भगूर येथील अजित दादांच्या सभेने नगर परिषद निवडणुकीचे वातावरण राष्ट्रवादीच्या बाजूने झुकले. नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण भागात शेती, धरणे तसेच विविध विकासकामे मार्गी लावण्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा सिंहाचा वाटा होता. विशेषतः सिन्नर तालुक्यातील गारगाई-देव नदी जोड प्रकल्पाला त्यांनी प्रशासकीय मान्यता मिळवून दिली. त्यामुळे हा राज्यातील एका तालुक्यासाठी असलेला एकमेव प्रकल्प ठरला आहे. नांदूर मधमेश्वर धरणाला गेट बसवण्यासाठी दिलेले योगदान, जिल्ह्यातील एकमेव सहकारी तत्त्वावर सुरू असलेल्या कादवा साखर कारखान्याला मिळालेले पाठबळ, तसेच दिंडोरीतील वळण योजना ही आज शेतकऱ्यांसाठी वरदान ठरली आहे. उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या अकाली निधनाने नाशिक जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्र एका प्रगल्भ नेतृत्वाला मुकला आहे. सन १९८४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत नाशिक जिल्ह्यातील १४ पैकी १३ जागांवर पुलोदचे आमदार निवडून देत नाशिककरांनी शरद पवार यांना भक्कम साथ दिली होती. त्यानंतर १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना झाल्यानंतरही ग्रामीण जनतेने पक्षाला भरभरून पाठिंबा दिला. २०२२ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतरही नाशिककरांनी अजित पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत ग्रामीण भागातील ११ पैकी सात आमदार राष्ट्रवादी काँग्रेसचे निवडून दिले. ग्रामीण भागाची तळमळ असलेले नेते म्हणून अजित पवार यांची ओळख होती. नाशिकचे लोकप्रतिनिधी कोणतीही समस्या किंवा प्रश्न घेऊन गेले असता, काही अपवाद वगळता ते प्रश्न मार्गी लागल्याशिवाय राहत नसत. सिन्नर तालुक्यातील गारगाई-देव नदी जोड प्रकल्पासाठी खासदार हेमंत गोडसे यांनी प्रयत्न केले, तर प्रशासकीय मान्यतेसाठी आमदार माणिक कोकाटे यांनी सातत्याने पाठपुरावा केला. अजित पवार यांच्या निर्णायक भूमिकेमुळे हा प्रकल्प मंजूर झाला असून, दुष्काळ हटविण्यासाठी तो मोलाचा ठरणार आहे. नांदूर मधमेश्वर धरण परिसरात गाळ साचल्यामुळे पाणी शेतीपर्यंत पोहोचत नव्हते, त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत होते. या धरणाला गेट बसवण्यासाठी आमदार दिलीप बनकर यांनी पाठपुरावा केला. अजित पवार यांनी त्यांना भक्कम साथ दिल्याने हा प्रकल्प पूर्ण झाला आणि परिसरातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले. निफाडसह इतर अनेक साखर कारखाने चुकीच्या धोरणांमुळे अडचणीत आले. मात्र जिल्ह्यातील एकमेव सहकारी तत्त्वावर चालणारा कादवा सहकारी साखर कारखाना अजित पवार यांच्या मदतीमुळे आजही चांगल्या स्थितीत आहे. या कारखान्याचे दीर्घकाळ चेअरमन असलेले श्रीराम शेटे यांना शरद पवार यांच्यासह अजित पवार यांचे मोठे पाठबळ लाभले. पश्चिमेकडील पाणी पूर्वेकडे वळवण्यासाठी दिंडोरी तालुक्यातील वळण योजना हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प तत्कालीन उपाध्यक्ष तथा मंत्री नरहरी झिरवळ यांच्या माध्यमातून अजित पवार यांनी यशस्वीपणे मार्गी लावला. त्यामुळे नद्यांमध्ये पाणी वाहू लागले आणि सिंचनाचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटला. नाशिकच्या शेतकऱ्यांची अर्थवाहिनी असलेली जिल्हा बँक डबघाईस आली. त्यामुळे अल्प, मध्यम व अल्पभूधारक शेतकरी मोठ्या प्रमाणात अडचणीत आले. या बँकेला ऊर्जितावस्था आणण्यासाठी राज्य शासनाने हरप्रकारे प्रयत्न केले. परंतु कर्ज वसुली प्रमाणात न झाल्यामुळे बँकेला ऊर्जितावस्था येत नव्हती. बँकेची स्थिती सुधारावी यासाठी अजित दादांनी विशेष पॅकेज देखील जाहीर केले. पवार यांच्या प्रयत्नाने सहकार तज्ज्ञ विद्याधर अनासकर यांना जिल्हा बँकेच्या सल्लागार पदी नियुक्ती केली. परिणामी बँकेची वसुली देखील आता काही प्रमाणात पुढे सरकली असून भाग भांडवल निधीच्या आधारे बँक पुन्हा जिवंत होईल अशी अपेक्षा शेतकरी वर्गाकडून उपस्थित केली जात आहे. जिल्हा बँकेच्या मदतीमुळे त्यांची कृषी आणि सहकार क्षेत्राविषयी आस्था दिसून येते. नाशिक जिल्ह्यातील नगरपरिषद निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस नंबर १ राहण्यामागे देखील अजित दादा पवार यांचे मोठे योगदान राहिले आहेत. भगूर नगर परिषदेवर २५ ते ३० वर्षांनी राष्ट्रवादी काँग्रेस व मित्र पक्षाची सत्ता आली. भगूर येथील अजित दादांच्या सभेने नगर परिषद निवडणुकीचे वातावरण राष्ट्रवादीच्या बाजूने झुकले. परिणामी नगराध्यक्ष म्हणून प्रेरणा बलकवडे या नगराध्यक्षा झाल्या. अजितदादा पवार यांच्यावर नाशिकच्या ग्रामीण जनतेचा प्रचंड विश्वास होता. त्यांचेही नाशिकवर विशेष असे लक्ष होते. कृषी आणि सहकार खात्यांवर त्यांचे विशेष प्रेम होते. नाशिकमधील सात आमदारांसाठी ते ऊर्जा स्त्रोत होते. मात्र त्यांच्या अचानक जाण्याने नाशिक जिल्ह्यातील विशेषतः ग्रामीण भाग आज पोरका झाला आहे.



## ७७ व्या प्रजासत्ताक दिनी दिव्यांगांनी जिंकली सर्वांची मने

▸विदर्भ केसरी।

**यवतमाळ :** स्थानिक जीवन विकास मंदिर मतिमंद मुलांची निवासी शाळा वाघापूर यवतमाळ येथे अतिशय उत्साह व आनंदमय वातावरणात 77 वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उमेश जी निमकर, चंदू देशमुख, राऊत, इरफान मलनस, बल्लाळ, माला बल्लाळ, लता बल्लाळ, भारती ज्यांनी मॅडम,हिमानी जानी मॅडम तथा जानी परिवार तसेच पालक प्रतिनिधी म्हणून वासुदेव हजारे, सौ. लोखंडे ताई, चांदेकर काका,सौ.पाटील ताई त्याचप्रमाणे या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून माननीय बापूसाहेब देठे यांची विशेष उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाची शुभ सुरुवात संविधान वाचनाने करण्यात आली त्यानंतर उपस्थित सर्व मान्यवरांचे हस्ते महात्मा गांधी व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिमेचे पूजन तथा ध्वज पूजन करण्यात आले. कार्यक्रमाध्यक्ष माननीय बापूसाहेब देठे यांनी ध्वजारोहण करून झेंड्याला सलामी दिली त्यानंतर उपस्थित बालगोपालांनी राष्ट्रगीत तथा जय जय महाराष्ट्र माझा या महाराष्ट्र गीताने झेंड्याला मानवंदना दिली.

यावेळी उपस्थिततांपुढे दिव्यांगांनी विविध देशभक्तीपर गीत, सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरी करून सर्वांची मने जिंकली त्यानंतर हिमानी ज्यांनी मॅडम यांनी आपला 44 वा वाढदिवस साजरा करून मुलांना विशेष भेटवस्तू व खाऊ देऊन विशेष गौरव केला.

आपल्या मनोगतामध्ये निमकर सर यांनी दिव्यांग मुलांची देशभक्ती व त्यांचे सादरीकरण बघून आपण भारावून गेल्याचे प्रखर मत प्रतिपादित केले व या मुलांना घडविणाऱ्या शिक्षक वृंद व कर्मचारीवृंद यांचे गुणगान केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष साहेब ह्यांनी देखील मुलांचे गोड कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्र. मु.सौ गोरडे मॅडम यांनी तर आभार कुमारी सावळे मॅडम यांनी केले या कार्यक्रमाच्या यशस्वी ते करिता श्री. दुधे सर,श्री. दांडेकर सर,श्री. कवडे सर श्री.मुसळे,कुमारी खंडाते मॅडम श्री कुंभारकर सर तसेच कुमारी किर्दक सौ कांबळी श्री ढोबळे श्री शेंडे श्री इंगोले श्री खंदारे श्री.भामकर श्री.डोंगरे यांचे सहकार्य लाभले व कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमांती सर्वांच्या चहापानांचे आयोजन करण्यात आले होते.

# शक्तिपीठ महामार्गाची लांबी वाढणार

## ⏭ मूळ ८०३ किमीचा महामार्ग, आता होणार ८५६ किलोमीटर

▸विदर्भ केसरी।, प्रतिनिधी

**यवतमाळ :** जिल्ह्यातून जाणारा शक्तिपीठ महामार्ग सुरूवातीला ८०३ किलोमीटरचा होता. मात्र आता काही जिल्ह्यातील विरोधानंतर सरकारी पातळीवर तडजोडी झाल्या असून विरोधी जिल्ह्यांना वगळून हा महामार्ग होणार आहे. त्यामुळे या महामार्गाची लांबीही वाढणार आहे. आता या महामार्गाची एकूण लांबी ८५६ किलोमीटर होणार आहे.

कोल्हापूर, सांगली, सिंधुदुर्ग आदी जिल्ह्यात भूसंपादनाला विरोध करीत आंदोलने झाली. मात्र, सरकार हा महामार्ग पुढे नेण्यावर ठाम आहे. आता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने महामार्गाचे नवीन सुधारित संरेखन निश्चित करून प्रस्ताव राज्य सरकारकडे मंजुरीसाठी पाठविल्याची माहिती आहे. सुधारित प्रस्तावानुसार शक्तिपीठ महामार्गाची एकूण लांबी ८५६ किलोमीटर होण्याची शक्यता आहे. पूर्वी हा महामार्ग सुरुवातीला ८०३ आणि नंतर ८४० किमीचा प्रस्तावित होता. नवीन प्रस्तावानुसार महामार्ग आता १२ ऐवजी १३ जिल्ह्यांमधून जाणार आहे. महामार्गालगतच्या ३९५ गावांवर या प्रकल्पाचा परिणाम होणार आहे. एमएसआरडीसीच्या सुधारित संरेखनाला मान्यता मिळताच भूसंपादनाची प्रक्रिया वेग घेण्याची शक्यता आहे.

### ३९५ गावांमधून जाणार मार्ग

■ **शक्तिपीठ महामार्ग सुरुवातीला १२ जिल्ह्यांमधील ३७० गावांमधून जाणार होता. आता हा महामार्ग १८ धार्मिक स्थळांना जोडत ३९५ गावांमधून जाणार आहे. यात माहूर, तुळजापूर आणि कोल्हापूर, ही तीन शक्तिपीठे जोडली जाणार आहे. परळी वैजनाथ, औंढा नागनाथ, पंढरपूर, नरसोबाची वाडी अशी काही धार्मिक स्थळेही जोडली जाणार आहेत.**



### तांत्रिक, स्थानिक अडचणींमुळे बदल

■ **शक्तिपीठ महामार्ग समृद्धी महामार्गाच्या धर्तीवर उभारला जाणार आहे. पहिल्या संरेखनानंतर कोल्हापूर, सांगली, सिंधुदुर्ग आणि इतर काही जिल्ह्यांमध्ये विरोध झाला होता. त्यात काही ठिकाणी महामार्गाचा निर्णय रद्द करा, तर काही ठिकाणी संरेखन बदलावे, अशी मागणी होती. सरकारने ज्या भागांत विरोध आहे, त्या भागांतील संरेखन बदलून सुधारित आराखडा सादर करण्याचे निर्देश एमएसआरडीसीला दिले होते. त्यानुसार प्रथम ८४० किलोमीटरचे संरेखन तयार करण्यात आले होते. मात्र, त्यात काही तांत्रिक व स्थानिक अडचणी लक्षात आल्याने नव्याने काही बदल करण्यात आल्याचे सांगण्यात आले.**

दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l, Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
शुक्रवार, ३० जानेवारी २०२६ | ३

GOOD MORNING
## कॉटनसिटी
!! मना-मनात दारा-दारात फक्त विदर्भ केसरी!!

### सरकारी कामात अडथळा आणत कर्मचाऱ्याला मारहाण

उमरखेड : येथील बीएसएनएल कार्यालयात शासकीय कर्तव्य बजावत असताना एका कर्मचाऱ्याला मारहाण झाल्याची घटना समोर आली आहे. २० जानेवारी रोजी फिर्यादी स्वप्निल राजेंद्र होटे हे कार्यालयात काम करत असताना आरोपी संतोष शालीकराम कदम तिथे आला. 'मागील दोन तासांपासून नेटवर्क का बंद केले' असा जाब विचारत आरोपीने फिर्यादीशी वाद घातला आणि त्यांच्या डोळ्यावर बुक्कीने प्रहार करून जखमी केले. आरोपीने शिवीगाळ करत शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याने, उमरखेड पोलिसांनी आरोपीविरुद्ध कलम १३२, ३५२ आणि १२१ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

महत्त्वाचे



### परमेश्वर माध्यमिक विद्यालय लोहरा(ई.) येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**

पुसद :येथील युवक मंडळ द्वारा संचालित, परमेश्वर माध्यमिक विद्यालय लोहरा (ई.) येथे 77 वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानिमित्त आयोजित ध्वजारोहण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच मा. प्रकाश चव्हाण तर विशेष अतिथी म्हणून सरपंच मा.सुदामराव चिरंगे, पोलीस पाटील मा.धम्मदीप पाईकराव ,माजी मुख्याध्यापक मा.पि. के. राठोड सर, पंचायत समिती पुसद चे माजी उपसभापती सेवानिवृत्त शिक्षक मा. शांतनुराव मस्के, तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष मा.विजय राठोड, शाळेचे मुख्याध्यापक मा.शिवशंकर घरडे सर,

मा.प्रकाश चव्हाण इत्यादी उपस्थित होते तसेच प्रमुख अतिथी म्हणून अशोक लालसिंग चव्हाण, माजी सरपंच अनसिंग चव्हाण, उपसरपंच शेषराव चव्हाण, विठ्ठल चव्हाण, मदन राठोड, ग्रामपंचायत सदस्य रमेश चव्हाण, विनोद चव्हाण माजी उपसरपंच, संतोष राठोड, बबन मस्के, नेमीचंद अंबोरे ,उकंडराव राठोड, राठोड, पवन जाधव, सुनील चव्हाण ,नितीन अंभोरे ,विठ्ठल उत्तम चव्हाण, विशाल कांबळे ,संजय अंभोरे, डॉ. जाधव साहेब, भेदेकर साहेब, दत्ताराव मस्के, मिलिंद चव्हाण, हरिभाऊ चव्हाण इत्यादी गावातील सन्माननीय प्रतिष्ठित नागरिक मंचावर उपस्थित होते. लोहरा (ई) गावातील सरपंच मा .सुदामराव चिरंगे यांच्या हस्ते, समस्त विशेष अतिथीच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला. तत्पूर्वी भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन करण्यात आले आणि शाळेतील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतावर कवायत सादर केली. त्यानंतर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तसेच ग्रामपंचायत कार्यालय लोहरा(ई.) याही ठिकाणी,सर्व विद्यार्थी ,सन्माननीय व्यक्ती व गावातील प्रतिष्ठित नागरिक यांच्या उपस्थितीत ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला. तदनंतर परमेश्वर माध्यमिक विद्यालयात, सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला. यात विद्यार्थ्यांनी दर्जेदार नृत्य सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. यावेळी गावातील लहान ,थोर, महिला, पुरुष , विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन तथा आभार बी. डब्ल्यू. जमधाडे यांनी मानले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक ए. व्ही. राठोड, सुनील राठोड, शिवाजी राणे , मनोज राठोड, नितीन हगवने तसेच शिक्षकेतर कर्मचारी रमेश राठोड, नलावडे बाबू, रामदास यमजलवाड यांनी अथक परिश्रम घेतले.

### नगर परिषद उर्दू शाला क्रं १ मध्ये प्रजासत्ताक दिवस उत्साहात साजरा

**विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी**



26 जानेवारी 2026 रोजी शाळेत प्रजासत्ताक दिना निमित्त ध्वजारोहन नगरपरिषद चे नवनिर्वाचित सदस्या श्रीमती रुकय्या बेगम यांचे पुत्र तथा समाजसेवक श्री झहीर भाई यांच्या शुभहस्ते करण्यात आला. मुख्याध्यापक मोहम्मद मुजाहिद मोहम्मद हयात यांनी सन्माननीय पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले आणि सर्वांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा देऊन 26 जानेवारी बद्दल माहिती दिली. यानंतर शाळेतील मुलांनी कार्यक्रम प्रस्तुत केले. देशभक्ती वर कृती गीत गायन केले तसेच लहान लहान मुलांनी आपल्या भाषणातून देशप्रेमाची गवाही दिली. सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोहम्मद अल्ताफ सराने केला तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री मोहम्मद वसीम सर आणि नाजनीन सदफ यांनी खूप मेहनत घेतली.

### क्षुल्लक कारणावरून दगडाने मारहाण

दिग्रस: तालुक्यातील वाईमेढी येथे वैयक्तिक वादातून एका व्यक्तीवर जीवघेणा हल्ला झाल्याची घटना २७ जानेवारी रोजी घडली. फिर्यादी गणेश महादेव डवले (५०) हे जात असताना आरोपी बळीराम पेढरी बोबडे याने त्यांना आवाज दिला.

# ढोकळ्यात अळी !

## आशीर्वाद स्वीट मार्टविरोधात अन्न व औषध प्रशासनाकडे निवेदन

**विदर्भ केसरी। यवतमाळ:**

यवतमाळ,दि.२९ जानेवारी.... शहरातील स्टेट बँक चौक परिसरात असलेल्या आशीर्वाद स्वीट मार्ट येथून विक्री करण्यात आलेल्या ढोकळ्यामध्ये जिवंत अळ्या आढळून आल्याची गंभीर घटना उघडकीस आली असून,या प्रकरणी सहायक आयुक्त (अन्न) / अन्न सुरक्षा अधिकारी (FSSAI),यवतमाळ यांच्याकडे (गुरुवार),दिनांक 29 जानेवारी रोजी अधिकृत निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे,दिनांक 26 जानेवारी (सोमवार) रोजी सदर दुकानातून खरेदी करण्यात आलेल्या ढोकळ्यामध्ये अळ्या आढळून आल्या.

हे ढोकळे यवतमाळ पोलीस दलातील हवालदार मंजुळा किशोर



भगत यांनी ड्युटी संपल्यानंतर खरेदी करून घरी नेले होते.लहान बहिणीचा वाढदिवस असल्याने घरी नेण्यात आलेल्या या खाद्यपदार्थाचे सेवन लहान मुलांनीही केले,मात्र वाढदिवसाच्या मुलीने ढोकळा खात असताना त्यामध्ये प्रत्यक्ष अळी आढळून आली.या प्रकारामुळे लहान मुलांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असून कुटुंबीयांमध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. सदर प्रकार हा अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ चे सरळ उल्लंघन करणारा असून,नागरिकांच्या आरोग्याशी थेट खेळ करणारा गंभीर गुन्हा असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. याप्रकरणी संबंधित दुकानाची तात्काळ तपासणी,अन्ननमुने जप्त करून प्रयोगशाळा तपासणी,दोषी आढळल्यास दुकान सील अथवा परवाना रद्द करणे तसेच संबंधितांवर कायदेशीर गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. भविष्यात यवतमाळ शहरात अशा प्रकारे नागरिकांच्या आरोग्याशी खेळ होऊ नये,यासाठी अन्न सुरक्षा विभागाने विशेष तपास मोहीम राबवावी,अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली. निवेदन सादर करताना सोशल मीडिया कॉंग्रेस कमिटी यवतमाळ जिल्हाध्यक्ष कृष्णा पुसनाके,कॉम्रेड सचिन मनवर,गट्टू भगत,अरविंद राठोड,मोंटू तेलगोटे,विकास साहू,कुणाल शेटे तसेच प्रा. पंढरी पाठे यांची उपस्थिती होती. या घटनेमुळे यवतमाळ शहरातील अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाला असून,आता अन्न सुरक्षा विभाग कोणती ठोस कारवाई करतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे

## ३८ बैलांची सुटका

**विदर्भ केसरी। यवतमाळ :**

जनावर तस्करीने जिल्ह्यात अक्षरश: हैदोस घातला आहे. अशी तस्करी करणाऱ्या वाहनांची तपासणी सुरू असताना दूरूनच पोलिसांना पाहून तस्कर आपला कंटेनर सोडून पळाले. मात्र पोलिसांनी या वाहनातील ३८ बैलांची सहीसलामत सुटका केली.

हा थरारक प्रसंग नागपूर-हैदराबाद महामार्गावर दहेगाव फाटा येथे २८ जानेवारी रोजी दुपारी करण्यात आली. एका वाहनातून जनावरांची अवैधरीत्या वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती वडकी पोलिसांना मिळाली होती. त्यावरून पोलिसांनी लगेच आपल्या शासकीय वाहनाने महामार्गावरील दहेगाव फाटा गाठला. तेथे नाकाबंदी करून संशयित वाहनांची कसून तपासणी सुरू केली. ही तपासणी सुरू असतानाच यूपी २१डीटी ८७५४ क्रमांकाचा एक कंटेनर आला. मात्र या वाहनातील चालक आणि वाहक या दोघांनाही पोलिस दिसताच घाम फुटला. आपल्यावर कारवाई होणार या भीतीने त्यांनी कंटेनर तेथेच सोडून धूम ठोकली. पोलिसांनी त्यांचा बऱ्याच अंतरापर्यंत पाठलाग केला. मात्र ते पोलिसांच्या तावडीत सापडले नाही. त्यांच्या कंटेनरमध्ये तब्बल ३८ बैल कोंबून हैदराबादकडे नेले जात होते. पोलिसांनी ही जनावरे पंचासमक्ष ताब्यात घेतली. तसेच वाहनही ताब्यात घेण्यात आले.

पसार झालेले वाहन चालक आणि वाहक या दोघांवर कलम ३२५ बीएनएस सहकलम ५, ५ (अ)(ब), महाराष्ट्र पशुसंरक्षण कायदा सहकलम ११(१)(घ)(ड)(च)(ज), प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम सहकलम १८४/१७७ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

ही कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलिस अधिकारी रॉबीन बन्सल यांच्या मार्गदर्शनात वडकीचे सहायक पोलिस निरीक्षक सुखदेव भोरकडे यांच्या आदेशानुसार, सचिन नेवारे, भोजराज करपते, अरविंद चव्हाण, आकाश कुदुसे, विनोद मोतेवार, दीपक मडकाम या कर्मचाऱ्यांनी पार पाडली.

## गांजाची तस्करी करणाऱ्याला स्थागुशाच्या पथकाने पकडले



**विदर्भ केसरी। पुसद**

पुसद शहरातून शेंबाळपिंपरीकडे जाणाऱ्या मार्गावरील बोरी मुखरे येथे गांजाची तस्करी करणाऱ्या दुचाकी स्वराला रंगेहात पकडले आहे. त्याच्याकडून १ किलो ६६५ ग्रॅम गांजासह मोबाईल दुचाकी जप्त केली आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या कारवाईत ७८ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.ही कारवाई दि.२८ जानेवारी २०२६ रोजीच्या संध्याकाळी ६.४० वाजताच्या दरम्यान केली होती.

शेंबाळपिंपरी येथील विठ्ठल मंदिराजवळील वार्ड क्रमांक दोन मध्ये राहणारा सुनील प्रेमचंद जोशी वय ४८ वर्षे याला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले असून त्याच्या विरोधात शहर पोलीस ठाण्यामध्ये विविध कलमान्वये गुन्हे दाखल झाले आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाकडून मिळालेल्या माहितीनुसार घटनेच्या संध्याकाळी ४.४० वाजताच्या सुमारास पुसद उमरखेड या बायपास रोडवर स्थागुशाचे पथक पेट्रोलिंग करत होते. त्यानंतर सापळा रचला होता.

## राष्ट्रीय अपंग असोसिएशनतर्फे प्रजासत्ताक दिन उत्साहात

**विदर्भ केसरी। अमरावती:**

विद्या निधी शिक्षण मंडळ, राष्ट्रीय अपंग असोसिएशन, अमरावती आणि अपंग जनता दल (सामाजिक संघटना) यांच्या संयुक्त विद्यमाने कौडेश्वर रोड, बडनेरा येथे २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात दिव्यांग बांधवांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्या निधी शिक्षण मंडळाचे अध्यक्ष श्री. सुधाकर काळे यांनी भूषवले. प्रमुख अतिथी म्हणून अपंग जनता दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि पत्रकार शेख अनिस, तसेच विद्या निधी शिक्षण मंडळाच्या सचिव डॉ. सौ. जिजा काळे उपस्थित होत्या. सामाजिक बांधिलकीचा संदेश



दिव्यांगांच्या कल्याणासाठी कार्यरत असलेल्या या संस्थांनी एकत्र येत समाजात जागरूकता आणि सहानुभूतीचा संदेश दिला. या खास प्रसंगी १०० दिव्यांग व्यक्तींना मिठाईचे वाटप करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी यावेळी त्यांच्याशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

या कार्यक्रमाला मयूर मेश्राम, राहुल वानखडे, राजिक शाह, रुस्तम, अन्वर, सी. ज्योती देवकर, कांचन कुकडे, दीपक जाधव, लता मोहिते, सरोज पुनसे, अफसर खान, महेश ढगे, मुतलीक चौस, किशोर नागदिवे, करामत शाह, सुनील टिंगणे, शेख शकील, मोहम्मद राजिक, शेख इलाईज, वैशाली सपकाळ, शुभम सोनटक्के आणि संस्थेचे कर्मचारी उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात श्री. सुधाकर काळे म्हणाले की, "दिव्यांग बांधव समाजाचा अविभाज्य भाग आहेत. त्यांना केवळ मदतीचीच नव्हे, तर सन्मान आणि संधीची गरज आहे." शेख अनिस यांनीही दिव्यांग कल्याणासाठी राबवल्या जाणाऱ्या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संघटना सातत्याने प्रयत्नशील असल्याचे सांगितले. प्रजासत्ताक दिनाचा हा सोहळा दिव्यांग बांधवांसाठी प्रेरणादायी ठरला असून, अशा उपक्रमांमुळे त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी एक सकारात्मक पाऊल उचलले गेले आहे.

## विवेकानंद विद्यालयातील शिक्षकांचा खेळाडू विद्यार्थ्यासोबत दवाखान्यामध्ये गणराज्य दिन

**विदर्भ केसरी। यवतमाळ,**

येथील विवेकानंद विद्यालयात शिकणारा वर्ग ८ चा विद्यार्थी प्रेम साळुंके हा शाळेच्या मैदानावर कबड्डी खेळाच्या सरावादरम्यान उडी मारताना जमिनीवर पडला. त्याच्या डाव्या हातातील दोन्ही हाडं मोडली. वेदनेने विव्हळलेल्या प्रेमला तातडीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ येथे दाखल करण्यात आले. या विद्यार्थ्याला वडील नसल्याने व आईची परिस्थिती हालाखीची असल्याने तो जामडोह येथे मामाकडे राहतो परंतु मामाची देखील आर्थिक स्थिती ठीक नसल्याने तो मोलमजुरी करतो. या सर्व विवंचनेतच झालेल्या अपघातामुळे विद्यार्थी मानसिक तणावाखाली आलेला होता. मागील २-३ दिवसांमध्ये त्यांनी जेवण करणे देखील बंद केले होते. त्याच्या आईच्या डोळ्यातील अश्रू थांबत नव्हते.



कागदपत्रांचा अभाव आणि सुट्ट्यांमुळे ऑपरेशन देखील होत नसल्याने संपूर्ण कुटुंब तणावाखाली जगत असल्याची बाब शाळेतील शिक्षकांच्या लक्षात आली. २६ जानेवारी रोजी शाळेतील ध्वजवंदन आटोपून सर्व शिक्षक वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे विद्यार्थ्यांच्या भेटीसाठी गेले. त्या ठिकाणी विद्यार्थ्याला कागदी तिरंगा व खाऊ भेट देऊन त्याच्यासोबत गणराज्य दिन साजरा केला. त्याच्या कुटुंबाला आर्थिक मदत म्हणून शिक्षक व कर्मचारी यांनी मिळून गोळा केलेली ५ हजार रुपये रोख रक्कमदेखील सोपविण्यात आली. सोबतच त्याच्या ऑपरेशन करिता लागणाऱ्या रक्ताची व्यवस्था करून दिली. शाळेतील शिक्षकांसमोर त्याच्या आईने स्वतःची व्यथा मांडली व शाळेतील शिक्षकांनी देखील तितकाच जलद प्रतिसाद देत प्रत्येक अडचणीवर समाधान शोधले. व. ना. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत तातडीने ऑपरेशन करण्याचे आश्वासन दिले. या सर्व घटनेनंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहण्यासारखा होता. विद्यार्थ्याला मानसिक आणि आर्थिक बळ दिल्याने गणराज्य दिन खऱ्या अर्थाने साजरा करण्यात आल्याची भावना इतर रुग्णांनी व्यक्त केली. आज मंगळवार, दिनांक २७ जानेवारीला दुपारी ही शस्त्रक्रिया करण्यात आली.

## भव्य सीड प्रदर्शनीचे आयोजन

**विदर्भ केसरी। विजय निखाते**



**पुसद** व्ही. पी. कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, बोरगड येथे क्रॉप सायन्स या विषयांतर्गत भव्य सीड (बियाणे) प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनात तब्बल 1000 पेक्षा अधिक प्रकारच्या बियांची आकर्षक मांडणी करण्यात आली होती. यामध्ये विविध प्रकारच्या फळभाज्या, फुले, कडधान्ये, रानबिया, तेलबिया तसेच दुर्मिळ व पारंपरिक जातींच्या बियांचा व विविध प्रकारच्या औषधी वनस्पतीच्या बियांचा समावेश होता. या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. प्रत्येक विद्यार्थ्याने आपले सादरीकरण अतिशय नाविन्यपूर्ण, माहितीपूर्ण व शास्त्रीय पद्धतीने केले. दुर्मिळ जातींच्या बिया संकलित करून त्यांची माहिती देत विद्यार्थ्यांनी आपली संशोधनवृत्ती आणि सर्जनशीलता दाखवून दिली. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाच्या आधारे गुणांकन करण्यात आले. त्यामध्ये इयत्ता १२ वी विज्ञान विभागातून 1. पार्थ व्यवहारे 2. आर्यन पाईकराव 3. स्वरा सोनटक्के इयत्ता ११ वी विज्ञान विभागातून 1. धनश्री दुधाने 2. सेजल घाटे 3. सृष्टी बेहेरे या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सादरीकरण केल्याबद्दल त्यांना विशेष गुण देण्यात आले. या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी संस्थेच्या सचिव मा. सौ. अनिताताई काळे मॅडम, चिलवाडी गावच्या सरपंच संगीताताई काळे मॅडम, प्रियंका काळे मॅडम तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्या दीक्षित मॅडम उपस्थित होत्या. उपस्थित मान्यवरांनी सीड प्रदर्शनाचे भरभरून कौतुक करत विद्यार्थ्यांच्या उपक्रमशीलतेचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. क्रॉप सायन्स विषयाच्या विभागप्रमुख प्रा. कोल्हे मॅडम यांनी या सीड एक्झिबिशनसाठी विशेष पुढाकार घेऊन अत्यंत उत्कृष्ट नियोजन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# महिला सशक्तीकरणाकडे ठोस पाऊल

## 'समृद्ध महिला प्रकल्पा'तून महिलांना हक्काची बाजारपेठ

**विदर्भ केसरी। यवतमाळ**

महिलांच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय सक्षमीकरणाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण आणि ठोस पाऊल म्हणून भारतीय स्वयंसेवी संस्था महासंघ (भारत) यांच्या 'समृद्ध महिला प्रकल्पा' अंतर्गत महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांना थेट बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी भव्य उपक्रम राबविण्यात आला. मॅक्सलॉर्ड ग्लोबल इंडस्ट्रीज प्रा. लि. आणि वैदिकस्वाद फूड्स प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने, महिला सक्षमीकरण धोरणाअंतर्गत "एक्सक्लुझिव्ह शॉपी (Exclusive Outlet)" या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी बुधवार, दिनांक २८ जानेवारी २०२६ रोजी



सायंकाळी ४.३० वाजता विशेष मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर समृद्ध महिला प्रकल्पांतर्गत कार्यरत असलेल्या महिला उद्योजिका, महिला बचत गट आणि स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या मेळाव्यास उपस्थित महिलांनी आपल्या संस्थांमार्फत उत्पादित केलेल्या विविध उत्पादनांचे नमुने (Samples) सोबत आणले होते.

प्रत्येक उत्पादनाचे किमान चार नमुने कंपनीकडून स्वीकारण्यात आले. सर्व नमुन्यांचे पॅकेजिंग स्वच्छ, आकर्षक व व्यवस्थित असल्याचे विशेषत्वाने नमूद करण्यात आले. महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना कायमस्वरूपी विक्री मंच उपलब्ध करून देत बाजारपेठेशी थेट जोडण्याची सुवर्णसंधी महासंघाच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आली. महिलांसाठी स्वतंत्र आणि कायमस्वरूपी विक्री केंद्र उभारण्याचा हा उपक्रम महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी मैलाचा दगड ठरणार आहे. या कार्यक्रमाला भारतीय स्वयंसेवी संस्था महासंघ (भारत) चे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. संजय कांबळे, मॅक्सलॉर्ड ग्लोबल इंडस्ट्रीज प्रा. लि. व वैदिकस्वाद फूड्स प्रा. लि. चे संचालक काजोलकर, माझा महाराष्ट्रचे प्रकाश ओव्हळ, महासंघाचे आरोग्य विभाग प्रमुख डॉ. ढोकणे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अमरावती विभागीय अध्यक्ष विजयकुमार बुंदेला, यवतमाळ जिल्हाध्यक्ष डॉ. दीपक घरझोडे, कार्यालय प्रतिनिधी भानुदास बाचीफळे यांनी विशेष परिश्रम घेतले. हा उपक्रम केवळ महिलांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देणारा नसून, महिला सशक्तीकरणाच्या दिशेने एक प्रभावी आणि प्रेरणादायी पाऊल असल्याची भावना उपस्थितांमध्ये व्यक्त होत होती.

## खाजगी बस तपासणीसाठी आरटीओचा कडक आदेश

### यवतमाळ जिल्ह्यात विशेष तपासणी मोहीम सुरू

**विदर्भ केसरी। यवतमाळ**

यवतमाळ जिल्ह्यात खाजगी बस वाहनांकडून होत असलेली बेकायदेशीर वाहतूक, नियमभंग तसेच प्रवाशांच्या सुरक्षिततेकडे होत असलेले दुर्लक्ष लक्षात घेता उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, यवतमाळ यांनी खाजगी बस वाहनांची सखोल तपासणी करण्याचे कडक आदेश दिले आहेत. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी प्रशांत देशमुख यांच्या स्वाक्षरीने कार्यालयीन आदेश क्रमांक A-242 जारी करण्यात आला आहे.

या आदेशानुसार जिल्ह्यातील सर्व खाजगी बस वाहनांची तपासणी करताना अग्निशामक यंत्रणा, वाहन फिटनेस प्रमाणपत्र, विमा, आपत्कालीन दरवाजा, टप्पा वाहतूक परवाना, क्षमतेपेक्षा



अधिक प्रवासी वाहतूक, अतिरिक्त दर आकारणी, चालकाचा वैध परवाना तसेच इतर आवश्यक कागदपत्रांची काटेकोर तपासणी करण्यात येणार आहे.

तपासणीदरम्यान अवैध वाहतूक करताना खाजगी बस आढळून आल्यास संबंधित वाहनांवर मोटार वाहन कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येणार असून, करण्यात आलेल्या कारवाईचा सविस्तर अहवाल उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयात सादर करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

**■ विविध पथकांची नियुक्ती**

ही विशेष तपासणी मोहीम प्रभावीपणे राबविण्यासाठी वायुवेग पथक व इंटरसेप्टर वाहनांच्या माध्यमातून जिल्ह्यातील विविध भागांमध्ये कारवाई केली जाणार आहे.

यवतमाळ शहर व वणी क्षेत्र : वायुवेग पथक क्र. १ व इंटरसेप्टर क्र. ३

पुसद व दारव्हा क्षेत्र : वायुवेग पथक क्र. २

उमरखेड क्षेत्र : इंटरसेप्टर क्र. १ व २

या अचानक आणि कडक कारवाईच्या निर्णयामुळे खाजगी बस चालक व मालकांमध्ये खळबळ उडाली असून, प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आरटीओ प्रशासनाची ही मोहीम अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

## शेतातील तीन विद्युत मोटारींची चोरी

महागाव: तालुक्यातील टेंभी येथील एका शेतातून अज्ञात चोरट्यांनी पाणी उपसण्याच्या तीन मोटारी लंपास केल्या आहेत. फिर्यादी नारायण माधव चिकणे (६५) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, १९ जानेवारीच्या संध्याकाळ ते २० जानेवारीच्या सकाळ दरम्यान ही चोरी झाली. चोरट्यांनी शेतातील नाल्यात असलेल्या 'लक्ष्मी कंपनी'च्या प्रत्येकी ३ प्झ् च्या तीन मोटारी चोरून नेल्या, ज्यांची अंदाजे किंमत ३०,००० रुपये आहे. महागाव पोलिसांनी या चोरी प्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

महत्त्वाचे



## सराम पाटील विद्यालय पांढुर्णा आदर्श ता दारव्हा येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**▸विदर्भ केसरी। दारव्हा :प्रतिनिधी**

दारव्हा तालुक्यातील वसराम पाटील विद्यालय पांढुर्णा आदर्श येथे 26 जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला या निमित्य भारतीय ध्वज फडकविण्यात येऊन मानवंदना देण्यात आली. सकाळी सर्वप्रथम विद्यालय तील विद्यार्थी व शिक्षकानी प्रभात फेरी काढली लेझीम नृत्य व देशभक्तीपर गीतांवर लेझीम सादरीकरण करण्यात आले, देशभक्तीवर घोषणा देत ही प्रभात फेरी ग्रामपंचायत कार्यालय, संपूर्ण गाव व नंतर विद्यालयात येथे पोहोचली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.वेदिका पवार कु. गीतांजली राठोड कु.राणी राठोड, जय राठोड यांनी केले. वसराम पाटील विद्यालयाचे मुख्याध्यापक राजेश इंगळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले व तिरंग्याला मानवंदना देण्यात आली राष्ट्रगीत राज्यगीत व संविधानाची उद्देशिका तसेच अस साक्षरतेची शपथ घेण्यात आली, यावेळी गावातील प्रमुख मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यानंतर देशभक्तीपर गीतांची कवायत विद्यालयाच्या प्रांगणामध्ये घेण्यात आली उत्कृष्ट असा विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळाला लेझीम पथक व कवायत चे सर्व कार्य कु. खुशबू चांदुरे शिक्षिका यांनी केले प्रांगणामध्ये रांगोळी व सजावटीचे कार्य कु. शिवानी लव्हाळे शिक्षिका यांनी केले, कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री राजीव ठाकरे सहाय्यक शिक्षक यांनी केले, देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रम तसेच लेझीम नृत्य प्रजासत्ताक दिनाचे भाषण यामध्ये विद्यार्थ्यांनी आनंदाने सहभाग घेतला, विद्यार्थ्यांची शिस्त शालेय पोशाख विद्यार्थ्यांचे त्याचे नृत्य प्रभात फेरी कवायत अतिशय चांगल्या प्रकारे झाल्यामुळे सर्व गावकऱ्यांनी त्यांचे कौतुक केले मुख्याध्यापकाय मुख्याध्यापक श्री राजेश इंगळे यांनी त्यांच्या भाषणांमधून विद्यार्थ्यांना प्रजासत्ताक दिन महत्व विशद केले तसेच शाळेचे शिक्षकेतर कर्मचारी वीरेंद्र चव्हाण रमेश आडे उपस्थित होते व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी प्रजासत्ताक दिनाचा कार्यक्रम यशस्वी पार पडला.

## पराग अभ्यंकरांची नेत्रालय सिद्धी केंद्राला भेट

**▸विदर्भ केसरी। नागपूर,**

रा.स्व. संघाचे अ.भा. सेवा प्रमुख पराग अभ्यंकर यांनी माधव नेत्रालयाच्या सिद्धी केंद्राला भेट दिली तसेच विस्तारित प्रकल्पाच्या कामाची पाहणी केली. माधव रु१/२णालयामध्ये उपलब्ध सुविधा तसेच दृष्टी बाधितांसाठी चालविण्यात येत असलेल्या पुनर्वसन केंद्राच्या माध्यमातून सुरू असलेल्या कार्याची त्यांनी माहिती घेतली. यावेळी दृष्टीबाधित विद्यार्थ्यांशी त्यांनी संवाद साधला. पराग अभ्यंकर यांनी मध्य भारतातील एक प्रमुख केंद्र म्हणून माधव नेत्रालय स्थापित होईल, अशी अपेक्षा व्ये केली. त्यांचा शाल-श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. माधव नेत्रालयाचे रवींद्र भुसारी, उपाध्यक्ष निखिल मुंडले, महासचिव डॉ. अविनाशचंद्र अग्निहोत्री, सहसचिव डॉ. अनिल शर्मा, सिद्धी केंद्राचे संचालक सुधाकर गोखले, विश्वस्त संदीप धर्माधिकारी आदींची उपस्थिती होती.

# अजितदादांना सर्वपक्षीय श्रद्धांजली

### महाराष्ट्र शोकसागरात: अजितदादांना देसाईगंज येथे सर्वपक्षीय श्रद्धांजली

**▸विदर्भ केसरी। देसाईगंज.. बाबू कुरेशी..**





राज्याचे उपमुख्यमंत्री आणि जनसामान्यांचे नेते माननीय अजितदादा पवार यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र पोरका झाला आहे. बुधवारी बारामती येथे झालेल्या भीषण विमान अपघातात त्यांचे आकस्मिक निधन झाले. या दुर्दैवी घटनेत शहीद झालेल्या सर्वांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी आज, २९ जानेवारी रोजी देसाईगंज येथील हुतात्मा स्मारक परिसरात सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. भीषण अपघात आणि राज्याची हानी बारामती विमानतळावर लँडिंग दरम्यान झालेल्या तांत्रिक बिघाडामुळे अजितदादांचे विमान कोसळले. या भीषण दुर्घटनेत अजितदादांसह त्यांचे अंगरक्षक विदीप जाधव, पायलट कॅप्टन सुमित कपूर, कॅप्टन संभवी पाठक आणि फ्लाईट अटेंडंट पिंकी माळी यांनीही प्राण गमावले. एका कार्यक्षम नेतृत्वाचा असा अंत झाल्याने देसाईगंज शहरासह संपूर्ण जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत आहे. मान्यवरांची उपस्थिती आणि भावपूर्ण श्रद्धांजली देसाईगंज येथील हुतात्मा स्मारकासमोर सकाळी ११:३० वाजता आयोजित या शोकसभेला राजकीय, सामाजिक आणि व्यापारी क्षेत्रातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी आमदार रामदासजी मसराम आणि माजी आमदार कृष्णाजी गजबे यांनी अजितदादांच्या आठवणींना उजाळा दिला. "राज्याने एक तडफदार आणि विकासकामांचा ध्यास असलेला नेता गमावला आहे," अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. यावेळी आमदार रामदास मसराम, नगराध्यक्ष लताताई सुंदरकर, उद्योगपती आकाशभाऊ अग्रवाल,न. प. उपाध्यास नरेशजी विठ्ठलानी, जेसा मोटवानी, नगरसेवक बाळू माडूरवार, विलास लोखंडे,युनुस शेख, पिंकू बावणे,विकास प्रधान, मा. कृषी सभापती नानाभाऊ नाकाडे,तालुका अध्यक्ष रा. का. संजय साळवे, काँग्रेस तालुका अध्यक्ष राजू बुल्ले, जिल्हापाध्यस शैलेश पोटुवार, राका शहराध्यक्ष लतीफ शेख, मनोज तलमले, माजी उपसभाती नितीन राऊत, सेना तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर कवासे, विलास गोटेफोडे, नामदेव वसाके वनमाला पुसतोडे यांसह विविध पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. उपस्थित सर्वांनी दोन मिनिटे मौन पाळून मृतांच्या आत्म्यास शांती लाभो, अशी प्रार्थना केली. व्यापारी आणि शैक्षणिक क्षेत्राचा सहभाग शोकसभेत केवळ राजकीय नेतेच नव्हे, तर व्यापारी बांधव, शिक्षक आणि सामान्य नागरिकांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. लाडक्या नेत्याला अखेरचा निरोप देताना अनेकांचे डोळे पाणावले.

## रस्ता – नाली कामासाठी मिक्सरद्वारे काँक्रीट

### माल बनविणे स्थानिक नागरिकांच्या व लोकप्रतिनिधीच्या नजरेसमोर करण्यात यावे - नगरसेविका सौ.प्रांजली राहुल गुल्हाने नगर पंचायत नांदगाव खंडेश्वर

**▸विदर्भ केसरी। नांदगाव खंडेश्वर/अमोल धवसे**





नांदगाव खंडेश्वर नगर पंचायत अंतर्गत होणारे विकास कामादरम्यान, काँक्रीटचा माल (काँक्रीट मिक्स) हाताने/मॅन्युअली न बनवता. कामात पारदर्शकता (transparency) यावी आणि काँक्रीटचे योग्य प्रमाण (proper ratio of concrete) वापरले जावे, यासाठी मिक्सरचा वापर केला जात असतांना सर्व काँक्रीटचा माल हा केवळ आणि केवळ काँक्रीट मिक्सर मशीनद्वारेच (concrete mixer machine) बनवण्यात यावा. माल बनवण्याच्या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान स्थानिक नागरिक, प्रभागातील लोकप्रतिनिधी नगराध्यक्ष, सभापती,नगरसेवक, नगरसेविका, आणि जागरूक कार्यकर्त्यांना हजर राहण्याची परवानगी द्यावी, जेणेकरून कामाची गुणवत्ता सुनिश्चित करता येईल.

शासकीय निधीचा योग्य वापर व्हावा आणि काम दीर्घकाळ टिकावे, यासाठी ही पारदर्शक पद्धत अवलंबणे अत्यंत आवश्यक असल्याने नांदगाव खंडेश्वर नगर पंचायत अंतर्गत होणारे विकास कामे रस्ता / नाली कामासाठी मिक्सरद्वारे काँक्रीट माल बनविण्याची प्रक्रिया स्थानिक नागरिकांच्या व लोकप्रतिनिधीच्या नजरेसमोर करण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबत नगरसेविका सौ.प्रांजली राहुल गुल्हाने मुख्याधिकारी यांना विनंती केली की, नांदगाव खंडेश्वर नगर पंचायतीच्या अंतर्गत विविध निधीतून सुरू असलेल्या व सुरु होणारे रस्ता व नाली बांधकाम काँक्रिटीकरण कामामध्ये वापरण्यात येणारा मिक्सर माल (काँक्रीट) हा स्थानिक नागरिकांच्या व लोकप्रतिनिधी व प्रभागाचे नगरसेवक /नगरसेविका यांचे नजरेसमोर बनवण्यात यावा. या मागील मुख्य उद्देश म्हणजे कामात पारदर्शकता आणणे आणि शासनाच्या नियमांनुसार योग्य दर्जाचे साहित्य ( सिमेंट, वाळू, खडी,योग्य प्रमाणात ) वापरले जात आहे का, याची खात्री करणे हा आहे.

कामाचा दर्जा चांगला राहिल्यास रस्त्याचे आयुष्यमान वाढेल व शासकीय निधीचा योग्य वापर होईल. या संदर्भात संबंधित ठेकेदार आणि बांधकाम विभागाला सदर माल बनवण्याची प्रक्रिया प्रभागातील रहिवाशी नागरिकांचे किंवा स्थानिक प्रतिनिधीं नगरसेवक नगरसेविका याच्या देखरेखीखाली करण्याची सूचना द्याव्या अशी मागणी एका लेखी निवेदनाव्दारे नगरसेविका सौ.प्रांजली राहुल गुल्हाने यांनी मा. मुख्याधिकारी साहेब नगर पंचायत नांदगाव खंडेश्वर यांना केली आहे.

## भरदिवसा विद्यार्थिनीची छेडछाड.

### तीन अज्ञातांविरुद्ध पोक्सोअंतर्गत गुन्हा

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**

शहरात महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. कॉलेजमधून ट्यूशनला जात असलेल्या एका अल्पवयीन विद्यार्थिनीचा पाठलाग करून तिला ओढून नेण्याचा प्रयत्न करणाऱ्या तीन अनोळखी इसमांविरुद्ध मुर्तिजापूर शहर पोलिसांनी BNS आणि पोक्सो (POCSO) कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. दिनांक २९ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १२:०० वाजेच्या सुमारास, पीडित बालिका आपले कॉलेज संपवून ट्यूशन क्लाससाठी पायी जात होती. भट्टड लेआउट भागात पोहोचली असता, दोन तरुण लाल-काळ्या रंगाच्या पल्सर मोटरसायकलवर आले, तर एक जण पायी मागून येत होता. या तिघांनी संगनमत करून पीडितेचा पाठलाग केला. दुचाकीवरील दोघांनी पीडितेचे हात धरून तिला रस्त्याच्या कडेला ओढण्याचा प्रयत्न केला. या झटापटीत पीडित मुलगी खाली पडली आणि तिथे असलेल्या सिमेंटच्या खांबाला तिचा डावा पाय घासल्या गेल्याने ती जखमी झाली. पीडितेचे धाडस आणि पळ काढला आरोपींनी आपल्या पायी येणाऱ्या तिसऱ्या साथीदाराला "लवकर इकडे ये आणि हिला धर" असे ओरडून सांगत वाईट उद्देशाने तिला पकडण्याचा प्रयत्न केला. मात्र, पीडितेने हिंमत न हारता त्यांचे हात झटकले आणि तिथून जोराने समोर पळ काढला. काही अंतरावर गेल्यावर मागे वळून पाहिले असता, ते तिन्ही नराधम तिथून पसार झाले होते. घाबरलेल्या पीडितेने तात्काळ या घटनेची माहिती दिली. तिच्या जबानी रिपोर्टवरून मुर्तिजापूर शहर पोलिसांनी आरोपींविरुद्ध कलम ७४, ७५(१)(२), ७८(२) BNS सहकलम ११, १२ पोक्सो (POCSO) अंतर्गत गुन्हा (अप नं १०६/२०२६) दाखल केला आहे.

मूर्तिजापूर शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार अजीत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली ASI सुरेश पांडे (ब.नं. १०९९)

दाखल अधिकारी: WHC शालिनी (ब.नं. २१२१) भरदिवसा घडलेल्या या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, पोलिसांनी आरोपींचा शोध सुरू केला आहे.

## सोशल मीडिया स्टार्सचा दर्यापुरात गौरव; उद्या 'विदर्भ रील स्टार' स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा

**▸विदर्भ केसरी। दर्यापूर**

बदलत्या डिजिटल युगात तरुणाईच्या कलागुणांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी 'एकरूप बहुउदेशीय संस्था' संचलित 'युवा उद्योजक मंच, दर्यापूर' नेहमीच अग्रेसर राहिली आहे. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून आयोजित 'कोण होणार विदर्भाचा रील स्टार' या अनोख्या स्पर्धेचा भव्य बक्षीस वितरण समारंभ आणि 'युवा उद्योजक गौरव सोहळा' येत्या शनिवारी, ३१ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आला आहे.

आजच्या काळात सोशल मीडिया, विशेषतः 'रील्स' हे केवळ मनोरंजनाचे साधन न राहता प्रतिभेचे प्रदर्शन करण्याचे मोठे माध्यम बनले आहे. विदर्भातील कानाकोपऱ्यातून या स्पर्धेला उदंड प्रतिसाद लाभला असून, अनेक होतकरू कलाकारांनी आपल्या कल्पकतेने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. या स्पर्धेतून निवडल्या गेलेल्या उत्कृष्ट रील स्टार्सना या सोहळ्यात सन्मानित करण्यात येणार आहे.

केवळ कलाच नव्हे, तर ग्रामीण भागातील तरुण उद्योजक जे स्वतःच्या हिमतीवर नवनवीन उद्योग उभे करत आहेत, त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारण्यासाठी 'युवा उद्योजक गौरव' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यातून नवीन पिढीला उद्योजकतेची प्रेरणा मिळेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. हा सोहळा अकोट रोडवरील कृषी भवन येथे सकाळी ११:०० वाजता संपन्न होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जळमकर इंडस्ट्रीजचे संचालक मा. श्री. ऋषिकेशजी जळमकर असतील. प्रमुख मार्गदर्शक म्हणून दैनिक विदर्भ केसरी समूहाचे मुख्य संपादक मा. श्री. अमोलजी कंटाळे आपली उपस्थिती दर्शवून तरुणांशी संवाद साधतील.

याशिवाय, न्यू मा भवानी वीट भट्टीचे संचालक मा. श्री. राहुलजी बैताळे आणि अभिजीत गावंडे फोटोग्राफीचे संचालक मा. श्री. अभिजीतजी गावंडे हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहून विजेत्यांचा उत्साह वाढवतील. कलेचा सन्मान आणि जिद्दी उद्योजकांचा गौरव पाहण्यासाठी दर्यापूर शहर व तालुक्यातील नागरिक, सोशल मीडिया प्रेमी, तरुण-तरुणींनी आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन एकरूप बहुउदेशीय संस्था आणि युवा उद्योजक मंच च्या समस्त पदाधिकाऱ्यांनी केले आहे. या सोहळ्यामुळे दर्यापूरच्या सांस्कृतिक आणि व्यावसायिक वातावरणात एक नवी ऊर्जा निर्माण होणार आहे.

## अवैध रेती वाहतूक करणारी पिकअप जप्त

**▸विदर्भ केसरी। पांढरकवडा:**

पोलिसांनी एन.एच. ४४ रोडवरील टेंभी फाटा येथे कारवाई करत अवैध रेतीची वाहतूक करणारी मॅक्स पिकअप पकडली आहे. २८ जानेवारी रोजी पहाटेच्या सुमारास पोलिसांनी वाहन क्रमांक एमएच २७ एक्स २०५० अडवले. तपासणीत आरोपी गोपाल कुळसणे आणि प्रवीण पुरनाके हे चोरून आणलेली पाऊण ब्रास रेती वाहतूक करताना आढळले. पोलिसांनी ४,००० रुपयांची रेती आणि २ लाखांचे वाहन असा एकूण २,०४,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. दोन्ही आरोपींविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस करत आहेत.

## साखळी उपोषणाला वंचित बहुजन आघाडी व भीम टायगर सेनेचा जाहीर पाठिंबा

**▸विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**



कृषी उत्पन्न बाजार समिती, पुसद येथील कर्मचाऱ्यांनी दिनांक २३ जानेवारीपासून विविध प्रलंबित मागण्यांसाठी साखळी उपोषण सुरू केले असून, त्यांच्या सर्व मागण्या या पूर्णपणे योग्य, न्याय्य व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेशी संबंधित आहेत. विशेष बाब म्हणजे याआधीही कर्मचाऱ्यांनी आंदोलन केले असता प्रशासनाकडून लेखी स्वरूपात आश्वासन देण्यात आले होते, मात्र आजपर्यंत त्याची अंमलबजावणी न झाल्यामुळे कर्मचाऱ्यांना पुन्हा आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागला आहे. या आंदोलनाला वंचित बहुजन आघाडी व भीम टायगर सेना यांनी जाहीर पाठिंबा दर्शविला आहे. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा संघटक बुद्धरत्न भालेराव यांनी प्रशासन व संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट इशारा दिला की, "जर कृषी उत्पन्न बाजार समिती पुसद येथील कर्मचाऱ्यांना तात्काळ न्याय मिळाला नाही, तर हे साखळी उपोषण आमरण उपोषणात रूपांतरित करून आंदोलन अधिक तीव्र केले जाईल. अन्यायाविरोधात आम्ही गप्प बसणार नाही." तसेच भीम टायगर सेनेचे जिल्हाध्यक्ष किशोर कांबळे यांनीही ठाम भूमिका घेत सांगितले की, "कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी गरज पडल्यास आम्ही रस्त्यावर उतरून संयुक्त आंदोलन उभे करू. शोषित, वंचित आणि कामगारांच्या न्यायासाठी भीम टायगर सेना सदैव संघर्ष करेल." उपोषण स्थळी भीम टायगर सेनेचे जिल्हाध्यक्ष किशोर कांबळे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा संघटक बुद्धरत्न भालेराव, तालुका अध्यक्ष संदीप आढाव, तालुका महासचिव जयानंद उबाळे (विक्की भाऊ) यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. सर्वांनी एकमताने कर्मचाऱ्यांच्या मागण्यांना पाठिंबा देत प्रशासनाने तात्काळ निर्णय घ्यावा, अशी मागणी केली. दरम्यान, प्रशासनाने वेळीच दखल न घेतल्यास हे आंदोलन जिल्हाभर पसरवण्याचा इशारा देण्यात आला असून, येत्या काळात या आंदोलनाची तीव्रता वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## शेलू बोंडे जिल्हा परिषद शाळेचा वर्धापन दिन उत्साहात.

### ९३ वर्षीय पहिल्या विद्यार्थ्याचा सपत्नीक सत्कार. गुरु-शिष्य भेटीने जुन्या आठवणींना उजाळा. निवृत्त शिक्षक व माजी विद्यार्थ्यांच्या उपस्थितीने वातावरण भावूक.

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**



तालुक्यातील शैक्षणिक वारसा लाभलेल्या सेलू (बोंडे) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने आपल्या वाटचालीची ८५ वर्षे पूर्ण करून ८६ व्या वर्षात पदार्पण केले आहे. या ऐतिहासिक टप्प्याचे औचित्य साधून २४ जानेवारी २०२६ रोजी शाळेचा ८५ वा वाढदिवस आणि माजी विद्यार्थी स्नेहसंमेलन अत्यंत दिमाखदार सोहळ्यात पार पडले. विशेष म्हणजे, १९४० च्या पहिल्या तुकडीतील ९३ वर्षीय विद्यार्थी शंकरराव सरोदे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला, जो या सोहळ्याचा मुख्य आकर्षण ठरला. आजी-माजी विद्यार्थ्यांचा मेळावा या सोहळ्यानिमित्त शाळेतून प्राथमिक धडे गिरवून आज डॉक्टर, इंजिनिअर आणि प्रशासकीय सेवांमध्ये उच्च पदावर कार्यरत असलेले माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने एकत्र आले होते. निवृत्त आणि सध्या कार्यरत असलेल्या शिक्षकांच्या उपस्थितीने 'गुरु-शिष्य' भेटीचा दुर्मिळ योग जुळून आला. जुन्या आठवणींना उजाळा देताना अनेक माजी विद्यार्थी आणि शिक्षक भावूक झाले होते. उपस्थित मान्यवरांचा सत्कार बुके देऊन करण्यात आला, तर अनुपस्थित असलेल्यांनी संदेशाद्वारे शुभेच्छा पाठवल्या. ९३ वर्षीय शंकरराव सरोदे यांचा गौरव शाळेच्या स्थापनेवेळचे (१९४०) विद्यार्थी शंकरराव सरोदे (वय ९३ वर्षे) यांचा गावकरी, शाळा व्यवस्थापन समिती आणि प्रगती शेतकरी मंडळाच्या वतीने शाल, गौरवपत्र व बुके देऊन टाळ्यांच्या कडकडाटात सपत्नीक सन्मान करण्यात आला. तसेच, जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करणारा आणि अंतराळ संशोधन केंद्र (बंगळुरू) अभ्यास दौऱ्यासाठी निवड झालेला गुणवंत विद्यार्थी सौरभ वानखडे याचाही विशेष गौरव करण्यात आला. साखरा पॅटर्न व सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी कार्यक्रमाची सुरुवात शालेय लेझीम पथकाच्या चित्तथारक सादरीकरणाने झाली. जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांसोबतच, प्रभात किड्स अकोलाच्या मार्गदर्शनात चालविल्या जाणाऱ्या 'साखरा स्कूल पॅटर्न' कॉन्व्हेंटमधील चिमुकल्यांनीही आपल्या नृत्याविष्काराने उपस्थितांची मने जिंकली.

अतिथी म्हणून बोलताना गायक व कवी सुनील ढोकणे यांनी जिल्हा परिषद शाळांच्या गुणवत्तेवर भाष्य केले. ते म्हणाले, "येथील शिक्षक प्रशिक्षित असून त्यांनी घडवलेले विद्यार्थी आज मोठ्या पदांवर आहेत. खासगी शिक्षण महाग होत असताना सामान्य माणसाने आपली ही शाळा टिकवणे काळाची गरज आहे." निवृत्त पोलीस अधिकारी श्रीधर बोंडे यांच्या अध्यक्षतेखाली आणि सरपंच डॉ. शुभांगी बोंडे यांच्या हस्ते सोहळ्याचे उद्घाटन झाले. यावेळी शेतकरी नेते प्रशांत गावंडे, राजूभाऊ वानखडे, आशिष अग्रवाल, ज्येष्ठ कवी रामकृष्ण आसरे व परिसरातील मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी अनेक माजी विद्यार्थ्यांनी शाळेच्या विकासासाठी हजारो रुपयांची देणगी जाहीर केली, तर सुनील सरोदे व डॉ. शुभांगी बोंडे यांच्या वतीने शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे बहारदार संचालन शिक्षक सतीश वसू यांनी केले. मुख्याध्यापक मनीष कट्यारमल यांच्यासह प्रांजली ठाकरे, प्रणिता मोरे, योगेश मानेकर ,मोहण सरोदे व समस्त ग्रामस्थांनी या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

## चंद्रपूरच्या नगरसेवकांना वर्धेत सिने स्टाईल धमकी

**▸विदर्भ केसरी। वर्धा,**

चंद्रपूर लोकसभा मतदार संघाच्या काँग्रेसच्या खासदार प्रतिभा धानोरकर आणि काँग्रेस नेते आमदार विजय वडेट्टीवार यांच्या गटांत मनपा निवडणुकीनंतरचा वाद अधिक तीव्र झाला आहे.

अशातच गुरुवार २९ रोजी पहाटे वर्धा येथील सावंगी मेघे पोलिस ठाणे हद्दीत दोन्ही गटांमध्ये थेट संघर्षाची घटना घडली. पुण्यावरून परतणाऱ्या वडेट्टीवार गटातील नगरसेवकांची ट्रॅव्हल्स सिनेस्टाईल अडवून त्यांना धमकावण्यात आल्याची माहिती आहे. ही घटना खासदार गटाशी संबंधित काही जणांनी केल्याचा आरोप आहे. सावंगी पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. आ. विजय वडेट्टीवार यांच्या गटातील चंद्रपूर प्रभाग ६ चे नगरसेवक राजेश अड्डूर (३७), त्यांची पत्नी अश्विनी (३१), नगरसेवक मित्र सचिन कत्याल, सौफिया खान, अब्दुल करीम शेख, वसंता देशमुख, करिष्मा जंगम यांच्यासह इतर नगरसेवक कुटुंबीयांसोबत पुण्याला गेले होते. ते २८ जानेवारीला सायंकाळी एम. एच. ४० सी. पी. ९९२४ क्रमांकाच्या ट्रॅव्हल्सने परतत होते. मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गावरील चैनल क्र. ६०/६०० गणेशपूर परिसरात ट्रॅव्हल्ससमोर अचानक ५ ते ६ कार उभ्या करून रस्ता अडवण्यात आला. या कारमधून सौरभ ढोंबरे याच्यासह १० ते १५ जण खाली उतरले. सौरभ ढोंबरे ट्रॅव्हल्सजवळ येऊन सर्व नगरसेवक आमच्यासोबत चला, असे म्हणत वाद घालू लागला. सोहेल शेख यांच्याशी बोला असे सांगत त्याने नगरसेवकांशी हुज्जत घातली.

## 1 फेब्रुवारी रोजी सैनिक रॅलीचे आयोजन

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

गडचिरोली : गडचिरोली जिल्ह्यातील सर्व माजी सैनिक/ माजी सैनिक विधवा व अवलंबित यांना कळविण्यात येते की, 01 फेब्रुवारी 2026 रोजी रविवारला सकाळी 10.00 वा. सुरेश भट्ट सभागृह रेशीमबाग ग्राउंड, नागपूर येथे स्टेशन हेडक्वार्टर कामठी तर्फे सैनिक रॅलीचे आयोजन केलेले आहे. रॅलीमध्ये माजी सैनिक/माजी सैनिक विधवा यांचेकरीता रेकार्ड ऑफिस तर्फे तक्रार केंद्र, ई.सी.एच.एस. स्टॉल, मेडिकल स्टॉल, सी.एस.डी. स्टॉल व इतर स्टॉल लागणार आहेत. तरी जिल्ह्यातील माजी सैनिक/माजी सैनिक विधवा व अवलंबित यांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून सुविधांचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, गडचिरोली, सुधाकर पवार यांनी केले आहे.

# ब्रम्हपुरी येथील रस्ते व रेल्वे उड्डाणपुलाचे बांधकामासाठी आमरण उपोषण सुरू; आज ऊपोषणाचा ४ था दिवस..!

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे

ब्रम्हपुरी : ब्रम्हपुरी, वडसा, आरमोरी रस्त्याचे खोदकाम तसेच ब्रह्मपुरी - आरमोरी मार्गावरील उड्डाणपुलाचे संथ गतीने सुरू असलेले बांधकाम जलद गतीने पूर्णा करून रहदारी धारकांना रस्ता चांगला मिळावा यासाठी रिपब्लिकन पक्ष खोरीप शहराध्यक्ष तथा पत्रकार, सामाजिक कार्यकर्ता श्री. प्रशांत डांगे यांनी बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे चौक येथे दिनांक २६ जानेवारी २०२६ गणराज्य दिनापासून आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे. आज आमरण उपोषणाचा चौथा दिवस असून शासनाने अजूनही त्यांच्या उपोषणाची गंभीर दखल न घेतल्यामुळे त्यांची प्रकृती खालावत चाललेली आहे.

शासनाने जर उपोषणाची दखल घेतली नाही तर उपोषणाचे आंदोलन अधिक तीव्र केल्या जाईल असे झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये उपोषण कर्ते प्रशांत डांगे यांनी शासनाविरुद्ध व संबंधित ठेकेदाराविरुद्ध आपला रोष व्यक्त केला. जोपर्यंत नागपूरवरून बांधकाम विभागाचे मुख्य वरिष्ठ अभियंता अधिकारी येत नाही आणि जलद गतीने बांधकाम पूर्ण करण्याची लेखी हमी देत नाही तोपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार पक्का आहे असेही त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. प्रशांत डांगे यांच्या आमरण उपोषणाला विविध राजकीय नेते, सामाजिक संघटनांचे पुढारी व नातेवाईक मित्रपरिवार हे उपोषण स्थळाला भेट देत असून उपोषणाला आपला पाठिंबा दर्शवित आहेत. त्यांच्या मागण्या रास्त आहेत आणि त्या मागण्यांना पूर्ण करण्यासाठी भक्कमपणे पाठीशी संपूर्ण ताकतीनिशी उभे राहण्याचे सुतवाच भेट देणाऱ्यांनी केले आणि आपला अभिप्राय उपोषण स्थळी असलेल्या भेट पुस्तिकेत लिहिले.

दिनांक ३० जानेवारीला रस्ता रोको आंदोलन करून निद्रिस्त असलेल्या शासनाला व बांधकाम ठेकेदाराला जागे करण्यात येईल असे पद्माकर रामटेके यांनी पत्रकार परिषदेत आपले मनोगत व्यक्त त्यांना सांगितले. प्रशांत डांगे यांच्या आमरण उपोषण स्थळाला ब्रह्मपुरी पोलीस निरीक्षक प्रमोद बानबले यांनी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला आणि आपल्या विभागाचे तीन पोलीस कर्मचारी त्या ठिकाणी उपोषण कर्त्याच्या देखरेखी साठी तैनात केले. ब्रह्मपुरी आरोग्य विभाग हे सुद्धा प्रशांत डांगे यांच्या प्रकृती वरती बारीक लक्ष ठेवून वेळोवेळी त्यांच्या प्रकृती बद्दल चौकशी करित असून त्यांच्या आवश्यक असणाऱ्या चाचण्या करून त्यांच्यावर उपचार करण्याचा प्रयत्न करीत आहेत. उपोषण कर्ते प्रशांत डांगे यांच्या संपूर्ण मागण्यांना लवकरच यश मिळो अशी ब्रह्मपुरी व आजूबाजूच्या परिसरातील जनतेची सदिच्छा आहे.






## संक्षीप्त

### मूर्तिजापूर येथे स्व. आमदार प्रतिभाताई तिडके स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी



मूर्तिजापूर : येथील श्री गाडगे महाराज विद्यालय मंडळातर्फे गेल्या ४९ वर्षांपासून अविरत सुरू असलेल्या 'स्व. आमदार प्रतिभाताई तिडके स्मृती व्याख्यानमालेचे' यावर्षी सुवर्ण महोत्सवी (५० वे) वर्ष आहे. या व्याख्यानमालेचे आयोजन शुक्रवार, ३० जानेवारी आणि शनिवार, ३१ जानेवारी २०२६ रोजी करण्यात आले आहे. या व्याख्यानमालेचे स्वरूप व तपशील व्याख्यानमालेचे वेळापत्रक सत्र पुष्प विषय व्याख्याते दिनांक व वेळ प्रथम पुष्प 'अणू ते अनंत: एक अखंड प्रवास' विवेक नागपुरे आर्वी शुक्रवार, ३० जानेवारी २०२६ सायं. ७ ते ९ द्वितीय पुष्प 'अपरिचित श्रीराम' कु. भक्ती देशमुख अमरावती शनिवार, ३१ जानेवारी २०२६ सायं. ७ ते ९ श्री. गाडगे महाराज विद्यालय, मूर्तिजापूर. व्याख्यानमाला दिलेल्या वेळेवरच सुरू होईल, याची सर्व श्रोत्यांनी नोंद घ्यावी. श्री गाडगे महाराज विद्यालय मंडळाच्या वतीने आयोजित या वैचारिक सोहळ्याला मूर्तिजापूर मधील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन गाडगे महाराज विद्यालय मंडळ व सुप्रसिद्ध साहित्यिक व समिक्षक डॉ श्रीकांत तिडके व आयोजकांकडून करण्यात आले आहे.



### अकोल्यात 'राज्यस्तरीय सर्वशाखीय धनगर समाज वधू-वर परिचय मेळावा

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

मूर्तिजापूर : धनगर समाजातील विवाहयोग्य युवक-युवतींना हक्काचे व्यासपीठ मिळावे आणि समाजातील उपवर मुला-मुलींचे विवाह जुळवण्यास गती मिळावी, या उद्देशाने रविवार, १ फेब्रुवारी २०२६ रोजी अकोल्यात भव्य राज्यस्तरीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. बार्शिटाकळी रोडवरील आळंदा फाटा येथील 'राजयोग मंगल कार्यालय' येथे हा मेळावा पार पडणार आहे. 'राज्यस्तरीय सर्व शाखीय धनगर समाज वधू-वर परिचय मेळावा कार्यकारी मंडळ, अकोला' यांच्या वतीने या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. दिनांक: रविवार, १ फेब्रुवारी २०२६ वेळ: सकाळी १० वाजेपासून
स्थळ: राजयोग मंगल कार्यालय, आळंदा फाटा, बार्शिटाकळी रोड, अकोला. राज्यातून समाजबांधवांची उपस्थिती या मेळाव्याचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे यात कोणत्याही एका शाखेपुरते मर्यादित न राहता, सर्व शाखीय धनगर समाजातील वधू-वरांना सहभागी करून घेतले जाणार आहे. या कार्यक्रमासाठी संपूर्ण महाराष्ट्रभरातून समाजबांधव, पालक आणि उपवर युवक-युवती मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्यामुळे पालकांचा वेळ आणि श्रमाची बचत होणार असून, एकाच छताखाली राज्यभरातील स्थळांची माहिती उपलब्ध होणार आहे. जास्तीत जास्त समाजबांधवांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा आणि आपल्या पाल्यांची नोंदणी करून मेळाव्यास उपस्थित राहावे," अशी विनंती कार्यकारी मंडळ, राज्यस्तरीय धनगर समाज वधू-वर परिचय मेळावा, अकोला यांच्या वतीने करण्यात आली आहे.



### दारव्हा नगराध्यक्ष सुनीलभाऊ चिरडे यांनी स्वतः वार्ड क्रमांक ची पाहणी केली

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

दारव्हा : शहरातील प्रभाग क्रमांक दोन मधील भाग्यदय कॉलनी व प्रभाग क्रमांक पाच मधील इस्लामपुरा येथे नागरिकांना नालीच्या पाण्याचा प्रचंड त्रास होता याबाबत नागरिकांच्या मोठ्या प्रमाणात तक्रारी होत्या आज मंगळवारी दुपारी चार वाजता नगराध्यक्ष सुनीलभाऊ चिरडे यांनी स्वतःजातीने प्रभाग क्रमांक 5 मधील इस्लामपुरा व प्रभाग क्रमांक दोन भाग्यदेव कॉलनी येथे भेट देऊन नाल्यांची पाहणी केली तसेच त्वरित नालीच्या पाण्याचा बंदोबस्त करण्याच्या सूचना पालिकेच्या संबंधित विभागाला दिल्या यावेळी त्यांच्यासोबत नगरसेविका विशाखाताई बिहाडे, अभिषेक बिहाडे, हबीब जखुरा उपस्थित होते. यावेळी इस्लामपूर येथील नागरिक मोठ्या संख्येने त्या ठिकाणी उपस्थित होते ऑन द स्पॉट जाऊन नागरिकांच्या समस्या जाणून घेणारा नगराध्यक्ष शहराला मिळाल्याची भावना यावी नागरिकांमध्ये पाहायला मिळाली

### गडचिरोली जिल्ह्याकरीता स्थानिक सुट्टया जाहीर

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

गडचिरोली : महाराष्ट्र शासन राजकीय आणि सेवा विभागाच्या दिनांक 16 जानेवारी 1958 च्या शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी, अविश्यांत पंडा यांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन सन 2026 या वर्षाकरिता गडचिरोली जिल्ह्याकरीता पुढीलप्रमाणे स्थानिक सुट्टया जाहीर करण्यात येत आहे. सोमवार, दिनांक 02 मार्च 2026 रोजी, होळी (पहिला दिवस), शुक्रवार, दि.28 ऑगस्ट 2026 रोजी रक्षाबंधन, शुक्रवार, दिनांक 11 सप्टेंबर 2026 रोजी तान्हा पोळा. सदर आदेश गडचिरोली जिल्ह्यातील दिवाणी फौजदारी न्यायालये, अधिकोष (बँक) यांना लागू होणार नाही. असे जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी कळविले आहे.

## हनुमान मंदिराच्या मदतीसाठी मौशिखांब येथे दुहेरी डान्स प्रयोग; उद्या रंगणार सांस्कृतिक मेजवानी

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी




मौशिखांब : विदर्भ केसरी प्रतिनिधी / मंगेश सहारे हनुमान मंदिराच्या विकास काम व मदतीसाठी मौशिखांब येथे शुक्रवार, दिनांक 30 जानेवारी 2026 रोजी भव्य दुहेरी डान्स प्रयोगाचे आयोजन करण्यात आले आहे. हा सांस्कृतिक कार्यक्रम जय बजरंग सांस्कृतिक कला व क्रीडा मंडळ यांच्या सौजन्याने आयोजित करण्यात येत असून परिसरात या कार्यक्रमाबाबत उत्सुकतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या कार्यक्रमात बवाल लावणी डान्स ग्रुप तसेच डायमंड स्टार डान्स नाईट ग्रुप, भंडारा यांचा थरारक व रंगतदार दुहेरी डान्स प्रयोग सादर होणार आहे. प्रेक्षकांना मनोरंजनासोबतच सांस्कृतिक आनंद देणारा हा कार्यक्रम ठरणार असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले आहे.हा कार्यक्रम जय किसान नाट्य. कला मंडळाच्या रंगमच्यावर रंगणार आहे या दुहेरी डान्स प्रयोगाचे उद्घाटन अरविंदभाऊ कात्रटवार, सामाजिक कार्यकर्ते, जि. प. क्षेत्र मौशिखांब–मुरमाडी यांच्या शुभहस्ते होणार आहे. उद्घाटनप्रसंगी मान्यवरांची उपस्थिती लाभणार असून कार्यक्रमाला विशेष शोभा येणार आहे. या डान्स प्रयोगातून जमा होणारा संपूर्ण निधी हनुमान मान मंदिराच्या विकासकामांसाठी व दैनंदिन गरजांसाठी वापरण्यात येणार आहे. सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून धार्मिक कार्याला हातभार लावण्याचा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद असल्याची प्रतिक्रिया ग्रामस्थांतून व्यक्त होत आहे. परिसरातील नागरिक व प्रेक्षकवर्गाने मोठ्या संख्येने उपस्थित राहून या दुहेरी डान्स प्रयोगाचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन जय बजरंग सांस्कृतिक कला व क्रीडा मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे आहे. मौशिखांब परिसरात होणारा हा कार्यक्रम सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे बोलले जात आहे.

## खर्रा खाण्यासाठी पतीने पैसे न दिल्याने महिला घरातून बेपत्ता झाल्याची धक्कादायक घटना..!

### धानोरा तालुक्यातील खुटगांव येथील घटना

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे



धानोरा : तालुक्यातील खुटगांव येथे खर्रा खाण्यासाठी लागणारे पैसे पतीने देण्यास नकार दिल्याने संतापलेली एक 41 वर्षीय महिला घरातून बेपत्ता झाल्याची विचित्र आणि धक्कादायक घटना धानोरा तालुक्यातील खुटगाव येथे घडली आहे. या घटनेमुळे परिसरात चर्चांना उधाण आले असून चातगाव पोलीस ठाण्यात बेपत्ता झाल्याची नोंद करण्यात आली आहे. भाविका प्रमोद मेश्राम वय, 41 वर्ष असे बेपत्ता महिलेचे नाव असुन पती प्रमोद मेश्राम यांनी दिलेल्या तक्रारीनुसार भाविकाने त्यांच्याकडे खर्रा खाण्यासाठी पैसे मागितले होते. पतीने पैसे देण्यास स्पष्ट नकार दिला, ज्यावरून दोघांमध्ये शाब्दिक वाद झाला. या वादानंतर पती प्रमोद मेश्राम नेहमीप्रमाणे शेतावर कामासाठी निघून गेले.

प्रमोद मेश्राम सायंकाळी 5:30 वाजताच्या सुमारास घरी परतले असता मुलगा दुष्यंत याने सांगितले की, आई दुपारी 12:00. वा.च्या सुमारास चातगाव ला बाजार करायला जाते असे सांगून घरातून निघून गेली आहे. बराच वेळ झाला तरी ती परत न आल्याने कुटुंबीयांनी तिची शोधाशोध सुरू केली. तपासा दरम्यान, गावातील एका ऑटोचालकाने भाविका मेश्राम हिला खुटगाव - चातगाव मार्गावर पायी जाताना पाहिल्याचे समोर आले आहे.

बेपत्ता महिलेचे वर्णन : बांधा मजबूत, उंची अंदाजे 5 फूट, रंग सावळा, केस काळे, चेहरा गोल. अंगात हिरव्या रंगाची साडी व लाल रंगाचा ब्लाऊज परिधान केलेला आहे. ही महिला कुणाला आढळून आल्यास 9403249671, 9403440915 किंवा 7709734753 या क्रमांकावर तात्काळ संपर्क साधावा, असे आवाहन प्रभारी पोलिस अधिकाऱ्यांनी केले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास चातगाव पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी करत आहेत.

# झाडी आणि गोंडी बोली या ग्रामीण संस्कृतीचा जिवंत वारसा

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम




देसाईगंज (वडसा) : झाडी आणि माडिया गोंडी बोली ही समृद्ध, जिवंत आणि निसर्गाशी समरस असलेली बोली असून तिच्यात विशेष गोडवा आहे. या बोलीतून भावना सहज आणि प्रभावीपणे व्यक्त करता येतात. बोलीभाषा ही ग्रामीण संस्कृतीचा मौल्यवान वारसा असून यातून आपल्या संस्कृतीचा आत्मा व्यक्त होतो. बोली या पारंपरिक परंपरांचे जतन व संवर्धन करतात त्यामुळे बोलींचे जतन होणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन बोली भाषेवरील मार्गदर्शक तज्ञांनी केले.

मराठी भाषेतील विविध बोलीभाषांचे जतन, संवर्धन व प्रचार व्हावा या उद्देशाने मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र राज्य व भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने आदर्श कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, देसाईगंज (वडसा) येथे आयोजित 'बोलींचा जागर' मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' हा उपक्रम मोठ्या उत्साहात पार पाडला. यावेळी झाडी बोली आणि माडिया गोंडी भाषेवर मार्गदर्शक तज्ञांनी मंथन केले.

कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून आदर्श महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीराम गहाणे,जेष्ठ झाडीबोली नाट्य कलावंत पद्मश्री डॉ. परशुराम खुणे, प्रमुख अतिथी म्हणून सहाय्यक भाषा संचालक बाबासाहेब जगताप, झाडीबोलीतील मार्गदर्शक डॉ. सदानंद बोरकर, डॉ. श्याम मोहरकर, माडिया गोंडी भाषेवरील मार्गदर्शक प्राध्यापक डॉ. नरेश मडावी, डॉ. प्रिया गेडाम, विशेष अतिथी म्हणून झाडीपट्टीतील बहिणाबाई प्रसिद्ध झाडीबोली कवयित्री अंजनाबाई खुणे, मराठी विभाग प्रमुख गोंडवाना विद्यापीठ डॉ. सविता गोविंदवार, प्रसिद्ध कवी व ज्येष साहित्यिक प्रा. धनराज खानोरकर, मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. नरेंद्र आरेकर, भाषा संचालक अभय राजे कुलकर्णी, समन्वयक प्रा. डॉ. हितेंद्र धोटे, प्रा. डॉ. निहार बोदेले, प्रा. वैशाली लिचडे, प्रा. डॉ. अमोल चव्हाण आदी उपस्थित होते.

ग्रंथदिंडी दरम्यान आदिवासी नृत्याच्या सादरीकरणाने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. लेझीम, भजने, लोकगीते तसेच बोलीभाषा संवर्धनावरील घोषवाक्यांच्या गजरात संपूर्ण देसाईगंज शहर दुमदुमून गेले. गडचिरोली जिल्ह्यात बोलल्या जाणाऱ्या विविध बोलीभाषांचा प्रभावी उपयोग करत पथनाट्य सादर करण्यात आले. गोंडी बोलीतील सांस्कृतिक दर्शन घडवून देत गीतगायनाच्या माध्यमातून बोलीभाषांचे वैशिष्ट्य प्रभावीपणे मांडण्यात आले. झाडी बोलीतील विवाहप्रसंगी गायली जाणारी पारंपरिक मंगलाष्टके सादर करून लोकपरंपरेचे सुंदर दर्शन घडविण्यात आले. यावेळी प्रसिद्ध कलाकार हिरालाल पेंटर यांनी गडचिरोलीतील बोलीभाषांवर आधारित नकला व गीते सादर करत बोलीभाषांचा उत्कृष्ट जागर केला. विशेष म्हणजे मुख्य बाजारपेठेतून ग्रंथदिंडी जात असताना व्यावसायिकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद देत पालखी धरण्यासाठी पुढाकार घेतला. या सहभागामुळे कार्यक्रमाला सामाजिक एकात्मतेचे स्वरूप प्राप्त झाले.

महाविद्यालयाच्या प्रांगणात मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सुरुवात दीपप्रज्वलन आणि महापुरुषांच्या फोटोला मान्यवरांच्या हस्ते मल्यार्पण करण्यात आले. महाराष्ट्र गीत व गोंडवाना विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. गोंडी भाषेतील गीतांनी पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. प्राचार्य डॉ. श्रीराम गहाणे यांनी अध्यक्षीय भाषणात म्हणाले, आज बोलींचा जागर या कार्यक्रमातून झाडी आणि माडिया गोंडी बोलींचा इतिहास, संस्कृती, वैशिष्ट्ये सर्वांना समजून घेता आली. यासाठी शासनाचे आभार व्यक्त केले.

पद्मश्री डॉ. परशुराम खुणे यांनी झाडीपट्टी रंगभूमीच्या माध्यमातून झाडी बोली लोकांच्या मनामनात पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य देसाईगंजमधून सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. आपल्याला ज्या बोलीवर प्रेम आहे, ज्या संस्कृतीत आपण राहतो, त्या संस्कृतीतील सूक्ष्म बारकावे शोधून त्यात जगले पाहिजे, असे प्रतिपादन त्यांनी केले. मात्र आधुनिकीकरणाच्या युगात आपण हळूहळू आपली बोली विसरत चाललो आहोत, याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली. बोलीभाषेचा गोडवा निराळाच असून आज संवादात वचनबद्धता कमी होत चालल्याचेही त्यांनी सांगितले. आज झाडी बोलीची स्वतंत्र ओळख निर्माण झाली असून या बोलीवर जे साहित्य निर्माण होत आहे, ते आवर्जून वाचले पाहिजे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

भाषा संचालक अभयराजे कुलकर्णी यांनी शासनाच्या बोलींच्या जागर या उपक्रमाची भूमिका स्पष्ट केली. त्यांनी सांगितले की, भावना प्रभावीपणे व्यक्त करण्यासाठी बोलीभाषा हेच सर्वात सशक्त माध्यम आहे. प्रमाणभाषेत अधिकाधिक बोलीभाषेतील शब्दांचा समावेश झाल्यास मराठी भाषा अधिक समृद्ध होईल. या उद्देशानेच राज्यभर 'बोलींचा जागर' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. उत्कृष्ट आयोजनासाठी आदर्श महाविद्यालयाचे कौतुक केले.

झाडी बोलीवरील मार्गदर्शन करताना प्रा. सदानंद बोरकर यांनी सुरुवातीला भाषा संचालनालय, महाराष्ट्र शासनाचे आभार मानले. झाडी बोलीवर सातत्याने अधिवेशने होत असून बोलीभाषा ही आपल्या संस्कृतीची ओळख निर्माण करते, असे त्यांनी सांगितले. झाडी बोली टिकवून ठेवण्यासाठी योगदान दिल्याबद्दल हरिश्चंद्र बोरकर यांचे त्यांनी विशेष आभार मानले. पारंपरिक परंपरांचे जतन व संवर्धन करण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

झाडी बोली ही अत्यंत समृद्ध असून तिच्यातून अनेक कलावंत घडले आहेत. एक्का, रोवणी, डहाके, नाटके, दंडार यांसारख्या लोककलांमध्ये झाडी बोलीचा प्रभावी वापर केला जातो. झाडीपट्टी रंगभूमीवर सध्या १० हजारांहून अधिक कलाकार कार्यरत असून दरवर्षी सुमारे ८० कोटी रुपयांची उलाढाल होते. या बोलीभाषेवर आधारित दरवर्षी ४ हजारांपेक्षा अधिक नाट्यप्रयोग होत असून अनेकांना रोजगार मिळतो. मात्र या व्यापक कार्याची शासन दरबारी पुरेशी दखल घेतली जात नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. नाटकाच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधनाचे कार्य करणाऱ्या झाडीपट्टी नाटकांचे प्रतिनिधित्व सार्क इंटरनॅशनल स्तरावरही झाले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

झाडी बोलीवर मार्गदर्शन करताना डॉ. श्याम मोहरकर यांनी भौगोलिकतेनुसार झाडी बोलीच्या उपबोली अस्तित्वात असल्याचे सांगितले. झाडी बोलीवर सुमारे ५०० वर्षे गोंड राज्याचे वर्चस्व राहिल्याने गोंडी भाषेचा प्रभाव पडल्याचे त्यांनी नमूद केले. या बोलीत सुमारे ५० हजार शब्द अर्थासह नोंदविले गेले असून गडचिरोली जिल्ह्यात मानवी वस्तीपासूनच ही भाषा अस्तित्वात असल्याचे त्यांनी सांगितले.

झाडी बोलीने मराठीचे व्याकरण व स्वर स्वीकारले असून या बोलीत गोडवा व भावनिक ओलावा आहे. मात्र बोलीभाषेबाबत आजच्या तरुणांचा न्यूनगंड यामुळे शिकलेली मंडळी बोलीभाषेत बोलताना दिसत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

माडिया गोंडी भाषेवरील मार्गदर्शन करताना डॉ. नरेश मडावी यांनी या बोलीचा इतिहास, संस्कृती, कला व संवर्धनाची आवश्यकता स्पष्ट केली. एखादी बोली जेव्हा नष्ट होण्याच्या मार्गावर असते, तेव्हा तिचे जतन व संवर्धन करणे अत्यावश्यक ठरते, असे त्यांनी सांगितले. गोंडवाना भागातील गोंड ही प्रमुख आदिवासी जमात असून गोंडी ही अतिशय प्राचीन भाषा म्हणून ओळखली जाते. या भाषेचे समृद्ध साहित्य प्रामुख्याने मौखिक स्वरूपात उपलब्ध आहे. गोंडी भाषा ही द्राविडीयन भाषाकुलातील असून भारतातील १५ राज्ये व २ केंद्रशासित प्रदेशांमध्ये ती बोलली जाते, अशी माहिती त्यांनी दिली. ब्रिटिश काळातही माडिया गोंडी भाषेचा प्रशासकीय व दैनंदिन वापर झाल्याचे नमूद करत, कालांतराने इतर भाषांचा गोंडी भाषेवर प्रभाव पडल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सध्या भारतात सुमारे ३ लाख ७५ हजार ८ लोक गोंडी भाषा बोलतात, असेही त्यांनी यावेळी सांगितले. ही स्वयंपूर्ण बोली असून स्वतःचे व्याकरण आहे. मात्र सध्या ही भाषा काळाच्या ओघात मागे पडलेली आहे. गोंडी भाषेचे संवर्धन होण्यासाठी शब्द संग्रह तयार करणे, शाळांमध्ये या भाषेचे स्थान वाढविणे आवश्यक असल्याचे अधोरेखित केले.

प्रास्ताविक डॉ . सविता गोविंदवार यांनी केले. यावेळी त्यांनी बोलींचा जागर यासाठी गोंडवाना विद्यापीठाची निवड केल्याबद्द भाषा संचालनालयाचे आभार व्यक्त केले. मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. नरेंद्र आरेकर यांनी भाषा संचालनालय, महाराष्ट्र शासनाच्या 'बोलींचा जागर' या उपक्रमाचे कौतुक करत बोलीभाषा या प्रमाण भाषेला समृद्ध करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात, असे मत व्यक्त केले. तसेच ज्येष्ठ साहित्यिक प्रा. धनराज खानोरकर यांनी आपल्या बोलीभाषेतून म्हणी व कवितांचे सादरीकरण करून बोलीभाषांचे प्रभावी दर्शन घडविले.

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू TODAY
गडचिरोली GOOD MORNING

## कुरखेडा - ब्रह्मपुरी बस बंद विद्यार्थ्यांना व प्रवाशांना फटका

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

कुरखेडा : ऐन परीक्षेच्या कालावधीमध्ये ब्रह्मपुरी आगाराने कुरखेडा- वडसा- ब्रह्मपुरी बस बंद केल्याने त्याचा फटका विद्यार्थी व प्रवासांना बसला असून विद्यार्थी या बसेसची ताडकडत्त वाट पाहताना दिसून आले आहेत. सकाळी कुरखेडा वरून ९:३० वाजता व ११:३० वाजता येणारी ब्रह्मपुरी कुरखेडा बस ही त्याच वेळेवर सुरू करण्यात यावे व विद्यार्थ्यांची व प्रवासाची होणारी पिळवणूक थांबवण्यात यावी अशी मागणी प्रवाशांनी व विद्यार्थ्यांनी केली आहे. ब्रह्मपुरी आगाराने आज पासून बंद केलेली बस तात्काळ सुरू करण्यात यावे अशी एक मुखी मागणी प्रवासाने व विद्यार्थ्यांनी केली आहे. जर बसेस सुरू झाली नाही तर विद्यार्थी व प्रवाशी हे आंदोलन करतील असा इशारा बस आगार ब्रह्मपुरी यांना देण्यात आला आहे.



## संक्षीप्त



### महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियन DNE136 तालुका गडचिरोलीचे वतीने बांधला वनराई बंधारा

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

गडचिरोली : महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियन DNE 136 तालुका गडचिरोलीचे वतीने खुर्सा येथील कठाणी नदिवर खुर्सा जवळीक पाणीपुरवठा योजनेच्या स्त्रोताजवळ वनराई बंधारा बांधकाम करण्यात आले. वनराई बंधारे बांधुन पावसाचे वाहुन जाणारे पाणी अडवुन ते जमीनीत मुरविणे / जिरवणे व जमीनीतील पाण्याची पातळी वाढविणे हा एकमेव उद्देश डोळ्यासमोर ठेवुन अनिकेत पाटील गटविकास अधिकारी पंचायत समिती गडचिरोली यांचे संकल्पनेतुन खुर्सा पाणीपुरवठा योजनेच्या स्त्रोताजवळ बंधाऱ्यांचे काम करून पाणी अडविण्यात आले. यावेळी उपस्थित राजेंद्र भुयार सर अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. गडचिरोली, राहुल काळभोर सर प्रकल्प संचालक जि.ग्रा.वि.यं. जि.प. गडचिरोली, मा. पंकज भोयर सर उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा. प्र.) जि. प. गडचिरोली बेडके सहाय्यक गटविकास अधिकारी लक्ष्मण पाल व विनायक देव्हारे वि. अ. पंचायत यांनी भेट देऊन पाहणी केली. व स्वतः श्रमदान करून बंधारा बांधकाम चांगल्या दर्जाचे व्हावे यासाठी मार्गदर्शन केले. याकरिता तालुक्यातील ग्रामपंचायत अधिकारी युनियन DNE 136 चे सर्व ग्रामपंचायत अधिकारी यांनी जिल्हा कोषाध्यक्ष खुशाल नेवारे, तालुकाध्यक्ष महादेव निकुरे, सचिव रवि शिवणकर जिल्हा प्रसिद्धी प्रमुख महेंद्र मोहुर्ले, स्नेहलता बोरकर यांचे मार्गदर्शनात एकत्र येवुन वनराई बंधारा बांधकाम यशस्वी केले. यावेळी ग्रामपंचायत खुर्सा येथील सरपंच श्रीमती सुमित्रा वंसत पदा, उपसरपंच विनोद रामटेके, ग्रामपंचायत अधिकारी श्री. यशवंत भेंडारे व गावातील युवक यांनी मोलाचे सहकार्य केले.

# कुरखेडा शहरात धुळीचे साम्राज्य अपघाताला आमंत्रण

## व्यावसायिक व वाहन चालक त्रस्त; दररोज रोडवर पाणी मारण्याची होत आहे मागणी

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

कुरखेडा : कुरखेडा शहरातून सुरू झालेला राष्ट्रीय महामार्गाच्या खोदकामामुळे मोठ्या प्रमाणात शहरातील मुख्य बाजारपेठेमध्ये धुळीचे साम्राज्य निर्माण झाले असून या धुडीमुळे वाहन चालक सोबतच बाजारपेठेतील व्यावसायिक व ग्राहक त्रस्त झाले असून राष्ट्रीय महामार्गाच्या कामात दिरंगाई होत असल्याचा आरोप नागरिकाकडून लावल्या जात असून खोदकाम केलेल्या जागेवर संबंधित कंत्राट दाराने दररोज बाजारपेठेमध्ये सकाळ व संध्याकाळ दोन्ही वेळेला पाण्याचा फवारा करून होणाऱ्या धुळीच्या त्रासापासून नागरिकांना व व्यावसायिकांना होणारा त्रास कमी करावा व कासव गतीने सुरू असणारा राष्ट्रीय महामार्गाचा काम थोडा जलद गतीने करावा अशी एक मुखी मागणी व्यापारी बंधू व नागरिकांनी केली आहे. सोबतच सती नदीच्या पुलिया ते गोठणगाव टि पाईट नाका ते जांभूळखेडा रोडची दयनीय अवस्था झाली असून या मार्गावरून जाताना दुचाकी स्वार व सायकल स्वार विद्यार्थ्यांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे कारण या मार्गाचे काम दोन वर्षापासून सुरू असून रोडचे बांधकाम कासव गतीने होत असून या रोडवर प्रवास करताना आता प्रवाशांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. आता तर दररोज प्रवाशांना धुळीचा सामना करावा लागत असून या धुळीमुळे दुचाकी चालक व पैदलस्वारांना डोळ्यांची समस्या जाणवत असून अनेकांच्या डोळ्यात धुळीचे कण जात असल्याचे नागरिकांचे व विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. सदर मार्गावर कंत्राटदार हा पाणी मारत नसल्याचे बोलले जात आहे. सकाळी व सायंकाळच्या वेळेस या मार्गावर दोन्ही टाईम धूळ उडू नये याकरिता पाणी मारणे प्रशासनाने अनिवार्य केले असले तरी कंत्राटदार मात्र कामचुकारपणा करून नागरिकांचे जीव धोक्यात घालत असल्याचे गोठणगाव जांभुळखेडा एरंडी या गावचे नागरिकांचे म्हणणे आहे. संबंधित कंत्राटदाराने या मार्गाचे काम तात्काळ करून या परिसरातील नागरिकांना न्याय द्यावा अशी सुद्धा मागणी नागरिकांनी केली आहे. जिल्हाधिकारी यांनी अल्टीमेटम देऊन सुद्धा कंत्राटदार मात्र झोपेचे सोंग घेऊन कासव गतीने हळुवार काम करीत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे त्यामुळे या परिसरातील नागरिक लोकप्रतिनिधींवर संताप व्यक्त करत आहेत. लोकप्रतिनिधी फक्त सूचना देण्याकरिता येतात का असा सवाल सुद्धा आता नागरिक उपस्थित करीत आहेत. त्यामुळे हळुवार गतीने काम करणाऱ्या कंत्राट दारावर जिल्हाधिकाऱ्यांनी कारवाई करावी अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.





## साखरा घाटात अवैध रेती वाहतुकीचा धुमाकूळ, प्रशासनाची डोळेझाक..!

### पर्यावरण व महसूल दोन्ही धोक्यात...!

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

गडचिरोली : गडचिरोली जिल्हा मुख्यालयापासून जवळच असलेल्या साखरा घाट परिसरातून सुरु असलेली अवैध रेती वाहतूक आता लपूनछपून नव्हे, तर उघडपणे आणि निर्वावलेल्या पद्धतीने सुरु असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. नियम, कायदे आणि पर्यावरणीय समतोलाला पायदळी तुडवत दररोज शेकडो ट्रॅक्टर व जड वाहने नदीपात्रातून रेतीची खुलेआम वाहतूक करत आहेत. विशेष म्हणजे, अधिकृत कागदपत्रांमध्ये कमी प्रमाणाची टिपी दाखवून प्रत्यक्षात मर्यादेपेक्षा कितीतरी पटीने अधिक रेती साखरा घाटातून बाहेर नेली जात असल्याचे गंभीर आरोप स्थानिक नागरिकांकडून होत आहेत. वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस व परिणामकारक कारवाई होत नसल्याने संशयाची सुई थेट संबंधित अधिकाऱ्यांकडे वळली आहे.

या अनियंत्रित व अवैध उत्खननामुळे नदीपात्रांची मोठ्या प्रमाणात धूप होत असून, परिसरातील शेती, पिण्याच्या पाण्याचे स्रोत तसेच जैवविविधता गंभीर संकटात सापडली आहे. याचबरोबर भविष्यात पूरस्थिती निर्माण होण्याची दाट शक्यता असल्याचा इशाराही पर्यावरणतज्ज्ञांनी दिला आहे. महसूल विभागाकडून अधूनमधून कारवाईचा दिखावा केला जात असला, तरी ती कारवाई केवळ 'दाखवण्यासाठी' असल्याचा आरोप नागरिक व पर्यावरणप्रेमी संघटनांकडून होत आहे. अवैध रेती व्यवसायामुळे शासनाच्या महसुलाला कोट्यवधी रुपयांचा फटका बसत असून, हा पैसा नेमका कोणाच्या खिशात जातो, असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे. असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे. धक्कादायक बाब म्हणजे, परवानाधारक उत्खननाच्या नावाखाली नियमबाह्य आणि अमर्याद रेती उपसा केला जात असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. त्यामुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवरच नव्हे, तर प्रामाणिकतेवरही गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पर्यावरणप्रेमी संघटना व सामाजिक कार्यकर्त्यांनी साखरा घाटातील अवैध रेती वाहतुकीची उच्चस्तरीय चौकशी, दोषींवर कठोर कारवाई, तसेच ड्रोन सर्वेक्षण, जीपीएस ट्रॅकिंग आणि संयुक्त तपासणी पथकांची तात्काळ नेमणूक करण्याची जोरदार मागणी केली आहे. वेळीच ठोस आणि कडक पावले उचलली नाहीत, तर साखरा घाटासह संपूर्ण गडचिरोली जिल्ह्यातील नैसर्गिक संपत्तीचा ऱ्हास अटळ असल्याचा इशारा जाणकारांनी दिला आहे.

## एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कुल, अहेरी येथे इयत्ता ६ ते ९ वर्गात प्रवेशपुर्व परिक्षा

### अनुसुचित जमातीच्या, आदिम जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी परीक्षा

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी फुलचंद वाघाडे

गडचिरोली : सन 2026 - 27 याशैक्षणिक वर्षात आदिवासी क्षेत्रातील अनुसुचित जमातीच्या व आदिम जमातीच्या विद्यार्थ्यांना एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कुल, अहेरी ता. अहेरी जि. गडचिरोली येथील प्रवेश देण्याबाबतची योजना सुरु आहे. सन 2026-27 या शैक्षणिक वर्षात इयत्ता ६ वीच्या CBSE तसेच इयत्ता ७ वीते ९ वीचे वर्गातील विद्यार्थी अनुशेष भरुन काढण्यासाठी इंग्रजी माध्यमाच्या CBSE एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कुल,अहेरी ता. अहेरी जि. गडचिरोली येथे प्रवेशासाठी प्रवेशपुर्व स्पर्धा परीक्षा घेण्यात येणार आहे. शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा, सर्व जिल्हापरिषद, नगरपंचायत व नगरपालीका शाळा व इतर प्राथमिक /माध्यमिक शाळेतील सन 2025-26 या शैक्षणिक वर्षात इयत्ता ५ वी ते ८ वीचे वर्गात शिकत असलेले परंतु ज्या पालकांचे उत्पन्न रुपये सहा लक्ष पेक्षा कमी आहे, अशाच पालकांचे पाल्य (विद्यार्थी) हे सदर स्पर्धा परीक्षेत बसण्यास पात्र राहतील. सदर स्पर्धा परीक्षा दिनांक 01 मार्च 2026 रोजी वर्ग ६ वी ची सकाळी ११.०० ते १३.०० या वेळेत तसेच वर्ग ७ वी ते ९ वी ची परीक्षा सकाळी ११.०० ते १४.०० या कार्यालया मार्फत एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कुल अहेरी येर्थ आयोजित करण्यात येईल. इयत्ता ६ वी ची परीक्षा प्रवेश अर्ज व इयत्ता ७ वी ते ९ वी परीक्षा प्रवेश अर्ज दि. 15 फेब्रुवारी 2026 या अंतिम तारखे पर्यंत प्राचार्य / मुख्याध्यापक यांचे मार्फत मा. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अहेरी येथे कार्यालयीन वेळेतच अर्ज स्वीकारल्या जातील. ५) सदर परीक्षेचे अर्ज प्रकल्प अहेरी अंतर्गत येत असलेल्या सर्व आश्रमशाळा व एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कुल, अहेरी जि. गडचिरोली येथे उपलब्ध असतील व अंतिम तारखे नंतर अर्ज स्वीकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी, सहा लक्ष रु. उत्पन्नापेक्षा अधिक उत्पन्न असणा-या शासकीय /निमशासकीय सेवेत कर्मचा-यांच्या / पालकांच्या पाल्यांना एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुलमध्ये प्रवेश देता येणार नाही व पालकांनी खोटी माहिती सादर केल्यास त्यांचेवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल. अधिक माहिती साठी कार्यालय –प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अहेरी, खमनचेरु रोड अहेरी यांचेकडे दि.15 फेब्रुवारी 2026 पुर्वी संपर्क साधावा. संपर्क 9921061574 सदर योजने अंतर्गत प्राप्त होणा-या अर्जानूसार विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा घेऊन गुणवत्ते नूसार निवड केली जाईल. असे कुशल जैन सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्पअधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अहेरी यांनी कळविले आहे. प्रवेश परीक्षेचे स्वरुप: सोबत पीडीएफ जोडले आहे.

## शासकीय आश्रम शाळा कोरची येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात साजरा

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी फुलचंद वाघाडे






कोरची : येथील शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेत ७७ वा प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहात आणि विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. या निमित्ताने शाळेत पालक मेळावा आणि स्नेहसंमेलनाचेही आयोजन करण्यात आले होते, ज्याला पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे अध्यक्षपद शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हिरालाल उईके यांनी भूषवले. प्रमुख अतिथी म्हणून शाळेच्या माजी विद्यार्थिनी तथा सध्याच्या तालुका क्रीडा अधिकारी मंगला शेंडे उपस्थित होत्या. मान्यवरांच्या उपस्थितीत शाळेचे मुख्याध्यापक उमाकांत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

सांस्कृतिक कार्यक्रमातून सादर केले 'विविधतेत एकता' विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी आयोजित स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवले. यात प्रामुख्याने: मराठी, गुजराती, छत्तीसगढी,गोंडी, राजस्थानी आणि पंजाबी लोकनृत्यांचे सादरीकरण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या कलाकृतीतून विविध प्रांतांच्या संस्कृतीचा बहारदार आविष्कार सादर केला. त्याचबरोबर पालक आणि शिक्षकांमधील सुसंवाद वाढवण्यासाठी विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाचे सुरेख सुत्रसंचालन इयत्ता अकरावची विद्यार्थ्यांनी कु.संचिता हुपुंडी हिने केले कार्यक्रमासाठी उपस्थित पालक व पाहुण्यांचे विशेष आभार अरुण कायंदे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांस्कृतिक प्रमुख गीता राऊत, प्रीती खंडात, धनश्री परतेती आणि सुषमा आंबोणे,भारती साखरे,सुमन अडभैया, चंद्रकला पटले यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच शाळेतील शिक्षक वृंद व कर्मचारी- यावेळी शाळेतील हरेश कामडी, अभिमन्यू वाटगुरे, राहुल अंधारे, कृष्णा गावडे, मनोज गजभिये, अरुण कायंदे, प्रमोद शंभरकर भैयालाल कुरसंगे, गुरुराज मेंढे, कुणाल गोवर्धन, संतोष सहारे, अमित मेश्राम, भूमेश शेंडे, मयूर दोनाडकर, ओमप्रकाश रहिले, प्रथमेश पाटोळे, सुधाकर पुसाम, नैना येगंलवार, मनोज आचार्य आणि अधीक्षक डाकराम ठाकरे, सीमा कुरेकार यांनी कार्यक्रमाच्या नियोजनात मोलाचे सहकार्य केले. तसेच कोरची परिसरातील बहुसंख्येने पालक उपस्थित होते.

उपस्थित पालकांसाठी शाळेच्या वतीने भोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या पालकांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करत कार्यक्रमाचा आनंद लुटला.

## पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना नुतनीकरण अर्ज सादर करण्याचे आवाहन

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

गडचिरोली दि.28 : सन 2025-26 करीता पंडीत दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना नुतनीकरणास पात्र विद्यार्थ्यांनी अद्याप पर्यत नुतनीकरण अर्ज सादर केला नाही, अशा विद्यार्थ्यांनी 31 जानेवारी 2026 पर्यत अर्ज सादर करावेत. दिनांक 31 जानेवारी 2026 पर्यत नुतनीकरणास पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज प्राप्त न झाल्यास त्यांच्या जागी नवीन विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी. असे सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी प्रशासन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली अरुण एम. यांनी कळविले आहे.

# लाहेरी शासकीय आश्रम शाळेतील विषबाधेची धक्कादायक घटना : आश्रम शाळा व्यवस्थापनाची निष्काळजीपणाचा कळस

## आश्रम शाळा परिसरातील घानीचे साम्राज्य बघता अधिक्षक तसेच मुख्याध्यापकांचा हलगर्जीपणा उघड..!

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

भामरागड (जि.गडचिरोली):- भामरागड एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत येणाऱ्या शासकीय आश्रम शाळा, लाहेरी येथे जेवणातून विषबाधा झाल्याची अत्यंत गंभीर व धक्कादायक घटना उघडकीस आली असून, या घटनेत तब्बल ७० आदिवासी विद्यार्थ्यांची प्रकृती अचानक बिघडली. जेवणानंतर विद्यार्थ्यांना उलटी, मळमळ व तीव्र पोटदुखीचा त्रास सुरू झाल्याने शाळेत एकच खळबळ उडाली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता तात्काळ PSC लाहेरी व ग्रामीण रुग्णालय भामरागड येथे ४९ विद्यार्थ्यांना उपचारासाठी दाखल करण्यात आले, तर प्रकृती गंभीर असलेल्या दोन विद्यार्थ्यांना उपजिल्हा रुग्णालय, अहेरी येथे पुढील उपचारासाठी हलवण्यात आले. सुदैवाने वेळीच उपचार मिळाल्याने मोठी दुर्घटना टळली असली, तरी या घटनेने आश्रम शाळांमधील व्यवस्थापनावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

घटनास्थळी प्रकल्प अधिकारी राऊत साहेब व तहसीलदार किशोर बाघडे साहेब यांच्या उपस्थितीत जेवणातील सर्व अन्ननमुने (फूड सॅम्पल्स) तपासणीसाठी घेण्यात आले. मात्र, प्राथमिक पाहणीतच धक्कादायक वास्तव समोर आले आहे. शाळेच्या किचन रूममध्ये सडलेले केडी, अस्ताव्यस्त व कुजलेला भाजीपाला, स्वयंपाकाच्या परिसरात अस्वच्छता, तसेच बाहेर घाण साचलेली असल्याचे भयावह चित्र दिसून आले. या परिस्थितीवरून विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी थेट खेळ केला जात असल्याचा संशय अधिक बळावतो आहे.

या संपूर्ण प्रकारावरून असे स्पष्ट दिसते की, मुख्याध्यापक, गृहपाल तसेच संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांनी स्वयंपाकघर, अन्नसाठा व स्वच्छतेकडे पूर्णतः दुर्लक्ष केले. याच निष्काळजीपणामुळे निष्पाप आदिवासी मुलांचे जीव धोक्यात आले, अशी संतप्त प्रतिक्रिया पालकवर्ग व ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, अशीच विषबाधेची घटना मागील एक-दोन वर्षांपूर्वी कोठी आश्रम शाळा तसेच संत मानवदयाल आश्रम शाळा, चिचोडा येथे घडूनही प्रशासनाने कोणतीही ठोस दखल घेतली नाही, हेही आता समोर येत आहे. वारंवार घडणाऱ्या या घटनांमुळे आश्रम शाळांमधील अन्नसुरक्षा व्यवस्था फक्त कागदावरच असल्याचा आरोप होत आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच सर्व आश्रम शाळांमध्ये अन्नगुणवत्ता, स्वच्छता व आरोग्य तपासणीची सक्तीने अंमलबजावणी करावी, अशी जोरदार मागणी सामाजिक संघटना, पालक व स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे. आदिवासी भागातील मुलांसाठी शिक्षणाबरोबरच सुरक्षित अन्न व आरोग्य ही शासनाची मूलभूत जबाबदारी आहे. मात्र, वारंवार होणाऱ्या अशा घटनांमुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्न निर्माण झाले असून, यापुढे तरी निष्काळजीपणाला आळा बसेल का? असा सवाल उपस्थित होत आहे.

